राजकवि श्रीहर्षविरचित

रत्नावली नाटिका

[सरळ समवृत्त मराठी भाषांतर]

रचनाकार

शां. आ. सबनीस,

बी. ए., एल्‌एल्‌. बी.

सॉलिसीटर, मुंबई.

प्रथमावृत्ति

किंमत एक रुपया

प्रकाशक

शां. आ. सबनीस,

इंदिरानिवास; न्यू-भटवाडी, मुंबई नं. ४.

अम गोखले,
'विज॰ शनवार, पु

शुद्धिपत्र

पान १ श्लोक १.

" स्तनांच्या भरें " ('नां' वर अनुस्वार.)

पान १ श्लोक ३ ओळ ३ री.

'तदा' या शब्दापुढें अनुस्वार वाचावा.

पान ६ द्विपदीखंड (१३) ओळ ४ थी.

" अधीर करि कामिजनाह्म "

पान ११ श्लोक २० ओळ १ ली.

प्रत्यग्रमज्जनगुणें तव कांति साजे ॥

पान ११ श्लोक २० ओळ ३ री.

" मन्मथपूजनांत " ('थ'च्या जागीं 'य' चुकून छापला गेला आहे.)

पान १२ श्लोक २३.

खालीं दिल्याप्रमाणें वाचावा.

जातां पार निरस्ततेज सविता अस्ताचला सोडुनी ।
द्वारीं ये नृपसंघ बा ! उदयना ! सोत्कंठ त्वद्दर्शनीं ॥
देती जे नयनोत्सवा, हरिति जे रक्तोत्पलांची प्रभा ।
त्या पादां तव जेविं चंद्रकिरणा सेवावया हा उभा ॥

पान १९ श्लोक ५ ओळ १ ली.

" श्रीकौस्तुभाची " (एक शब्द.)

पान १९ श्लोक ४.

संबंधीं, पानाच्या शेवटीं दिलेल्या पहिल्या दोन ओळी रद्द करून त्यांच्या जागीं पुढीलप्रमाणें वाचाव्या—

अलंकार श्लेष व उत्प्रेक्षा; **उद्दामोत्कलिका** (१) जिला कळ्यांचा बेसुमार बहार आला आहे अशी लता

प्रथमार्धांत होऊन गेलेल्या काश्मीरच्या श्रीहर्षानें हा ग्रंथ लिहिला नाहीं हें स्पष्ट होतें. तेव्हां सातव्या शतकांत कान्यकुब्ज देशाचें राज्य करीत असलेल्या श्रीहर्षाचे पदरीं या नाटिकेचें ग्रंथकर्तृत्व येतें असा सहज निष्कर्ष निघतो.

पण या निर्णयानंतरही दुसरी एक भानगड उपस्थित होतेच. श्रीहर्षदेव हा एक वैभवशाली राजा असून बाण, मयूर वगैरे प्रख्यात कवि त्याचे आश्रयास होते. तेव्हां कीर्तीच्या लोभानें त्यानें एखाद्या पदरच्या कवीकडून हा ग्रंथ लिहून घेऊन आपल्या नांवानें प्रसिद्ध केला नसेल कशावरून? या संशयाला मम्मटाच्या काव्यप्रकाशांतील "श्रीहर्षादेर्धावकादीनामिव" या उल्लेखामुळें कांहींसा आधार मिळाला. काव्यप्रकाशाच्या टीकाकारांनीं या शब्दांवर मल्लिनाथी करून 'धावक' नांवाच्या कवीस पुष्कळ धन देऊन हर्षदेवानें 'रत्नावली' आपल्या नांवावर प्रकाशित करण्याचा हक्क प्राप्त केला असें विधान केलेलें आहे. पण 'धावक' नांवाच्या कवीचा इतरत्र कोठेंही उल्लेख आढळत नाहीं. काव्यप्रकाशाच्या काश्मिरी हस्तलेखांत "श्रीहर्षदेर्बाणादीनामिव" असें वरील शब्दाचें पाठांतर सांपडतें. त्यावरून रत्नावलीचें कर्तृत्व बाणकवीच्या गळ्यांत अडकविण्याचा कांहीं विद्वानांचा प्रयत्न आहे. पण याही कल्पनेंत विशेष तथ्यांश दिसत नाहीं. एकतर बाणासारखा विख्यात व संपन्न कवि आपला ग्रंथ निव्वळ द्रव्यासाठीं दुसऱ्याच्या नांवावर प्रसिद्ध करण्यास तयार होईल हें संभवत नाहीं. व दुसरें ज्या ज्या अन्य ग्रंथांत रत्नावलींतील उतारे घेतले आहेत त्या सर्व जागीं कर्ता म्हणून श्रीहर्षाच्याच नांवाचा स्पष्ट उल्लेख आहे. एवंच रत्नावलीचा कर्ता कान्यकुब्जाधिपति श्रीहर्ष असें धरून चालणें भाग येतें.

'रत्नावली'खेरीज श्रीहर्षाची दुसरीही ग्रंथरचना आहे ती येणेंप्रमाणें—[१] **प्रियदर्शिका,** ही रत्नावलीप्रमाणें उदयनराजासंबंधींची एक प्रणयकथा आहे. रत्नावली व प्रियदर्शिका यांची 'नाटिकां'त" गणना होते. [२] **नागानंद** हें नाटक बुद्धधर्माचा पुरस्कार करण्याच्या हेतूनें लिहिलेलें दिसतें. या ग्रंथाचा कर्ता बौद्धधर्मी होता असाही एका विद्वानाचा तर्क आहे. पण याच ग्रंथांतील अन्य पुराव्यांवरून ग्रंथकर्त्याचा शैव मतांकडे स्पष्ट ओढा दिसतो. एवढें खरें कीं, श्रीहर्षाच्या कालीं बौद्धधर्म उदयोन्मुख असून या राजाची सहानुभूति त्या धर्माकडे असण्याचा संभव होता अथवा बुद्धमतांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळें निव्वळ लोकाराधनाचा एक मार्ग म्हणून नागानंद नाटकाचा चरमभाग (शेवटचे दोन अंक)

एका विवक्षित वळणावर लिहिला गेला असेल. सदर नाटकाची एकंदर घडण पाहतां पहिले तीन शृंगाररसात्मक अंक शेवटल्या करुणरसप्रधान दोन अंकांशीं बरेच विसंगत दिसतात. [३] बुद्धस्तुतिपर कांहीं किरकोळ काव्यें. रत्नावली, नागानंद, प्रियदर्शिका यांचीं संविधानकें गुणाढ्याच्या बृहत्कथेंतून घेतलीं आहेत. प्रतिभा, भाषाप्रभुत्व व लेखनशैली यांचा विचार करितां, श्रीहर्ष, कालिदास–भवभूतीच्या तोडीचा नसला तरी बऱ्याच वरच्या दर्जाचा आहे. या नाटिकेची भाषाशैली सहजमनोहर, ओजस्वी, व्याकरणशुद्ध आहे. क्लिष्ट व दुर्बोध स्थळें बहुशः आढळत नाहींत. मनुष्यस्वभावाच्या गूढ व उत्कट भावनांचें आविष्करण कालिदास भवभूती-प्रमाणें सफाईदार व हृदयस्पर्शी नसलें तरी पात्रांचे स्वभावपरिपोष कृत्रिम व अतिशयोक्तीचे नसून साधारणपणें बरे साधले आहेत. हर्षासारख्या एका वैभव-शाली नृपतीनें राज्याची जबाबदारी शिरावर असतां वेळांत वेळ काढून सरस्वतीची निष्काम सेवा करावी हें अत्यंत कौतुकास्पद आहे. चारी बाजूंनीं परचक्राची भीति, 'बळी तो कान पिळी' हेंच राजनीतीचें प्रधान तत्त्व, नवीं राष्ट्रें उदयास येणें व जुनीं लय पावणें हा रोजचा खेळ, अशा कालांत एका हातांत तलवार व दुसऱ्यांत लेखणी घेऊन विद्वन्मान्य ग्रंथ लिहिणारा श्रीहर्ष खरा रसिक व निस्सीम साहित्य-सेवक असला पाहिजे. स्वतः ग्रंथकर्ता असून हा बाण–मयूर वगैरे विख्यात कवींचा पोशिंदा होता. आज हिंदुस्तानांत सार्वभौम आंग्लप्रभूच्या बलाढ्य छत्राच्या शीतल छायेखालीं, नितांत शांतिसौख्य भोगणारे राजे महाराजे अनेक आहेत. परचक्राची भीति नाहीं, लक्ष्मीची वाण नाहीं, उद्यांची चिंता नाहीं, लक्ष्मीधरजीप्रमाणें जडावाच्या मुठीची तलवार फक्त शोभा आणि रुबाब वाढविण्यासाठीं वापरावयाची अशा अत्यंत अनुकूल परिस्थितींत असतां किती राजामहाराजांनीं 'रत्नावली'-प्रमाणें चिरकाल टिकाव धरून राहणारे ग्रंथ लिहिले याची मोजदाद करूं गेल्यास आत्यंतिक निराशा नशिबीं येईल! पूर्वीं हिंदुस्तानांत विद्वान् होते तसे आजही आहेत; पण ख्यालीखुशाली व ऐषआराम उपभोगण्यांत प्रत्यहीं हजारों रुपये उड-विणाऱ्या राजेरजवाड्यांपैकीं कोणी एखाद्यानें रवींद्रनाथ टागोर किंवा जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्यांस उपकारबद्ध करून आपली कीर्ति अजरामर केली आहे? राजा विक्रम, भोज, श्रीहर्ष वगैरे राजपुरुष ज्या देशांत हजार पंधराशें वर्षांपूर्वीं होऊन गेले, त्याच देशांतील राजमंडळाची सध्यांच्या सुधारणा-युगांतील स्थिति विद्या-व्यासंगाच्या बाबतींत तरी समाधानकारक नाहीं असें कष्टानें म्हणणें भाग येतें.

रत्नावली नाटिकेचें संविधानक गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून घेतल्याचा उल्लेख वर आलाच आहे. संविधानकाचा गोषवारा देऊन प्रस्तुत लेख निष्कारण लांबविणें इष्ट नाहीं. "द्वीपादन्यस्मादपि मध्यादपि जलधेः" इत्यादि सूत्रधारोक्तीच्या अनुरोधानें कथाभागाचें अनुसंधान आहे. सिंहलेश्वराची कन्या रत्नावली ज्याची पत्नी होईल तो सार्वभौमपद पावेल या सिद्धवचनावर विश्वास असलेला यौगंधरायण प्रधान ती वत्सराजास मिळावी म्हणून हरप्रयत्न करीत असतां नौकाभंग होऊन ती प्राणसंकटांत सांपडते. पण दैव सर्वथा अनुकूल असल्यामुळें अनेक अडचणींतून निभावून ती वत्सराजाची राणी होते. मालती-माधव, नागानंद या नाटकांप्रमाणें रत्नावलीचा कथाभाग गुंतागुंतीचा अथवा बोजड नसून व्यवस्थेशीर व साधा आहे.

सर्व संस्कृत नाटकांची सुरुवात ईशस्तवनपर नांदीनें होते. नांदीच्या श्लोकांत कवि आपल्या इष्टदेवतेचें स्मरण करून नाटकगृहांत जमलेल्या प्रेक्षक वर्गास शुभाशीर्वाद देतो. कालिदासाच्या तिन्ही नाटकांप्रमाणें श्रीहर्षानेंही सुरुवातीच्या नांदीरूप श्लोकांत शंकराचीच स्तुति केली आहे.

नांदींत ईशस्तवनाशिवाय नाट्यकथानकाचा बीजरूपानें समावेश झालेला असावा असा नाट्यशास्त्राचा एक रूढ नियम आहे. त्यास अनुसरून टीकाकार नांदीचा शब्दागणिक कीस काढून, बादरायणसंबंधानें नाट्यकथानकाचे धागे जुळविण्याचा अट्टाहास करीत असतात. टीकाकारांच्या दृष्टीनें या गोष्टीचें कितीही महत्त्व असो; पण सामान्य वाचकांस तो प्रकार बहुशः कंटाळवाणा वाटण्याचा संभव असल्यामुळें, रत्नावलीच्या सुरवातीच्या श्लोकांत बीजरूपानें संगृहित केलेल्या कथानकाचें विवरण करण्याचा यत्न केलेला नाहीं.

संविधानकांतील प्रमुख पात्रांच्या स्वभावपरिपोषाबद्दल थोडा विचार करूं. **वत्सराज** हा अग्निमित्र, दुष्यंत, यांच्या साधारण कोटींतला नायक आहे. प्रद्योतकन्या महाराणी वासवदत्ता इचें मन यत्किंचित्ही नाराज होऊं नये म्हणून तो शक्य तेवढी खबरदारी घेत असतो. त्याच्याच स्वतःच्या कबुलीजाबाप्रमाणें त्याचें कामुक मन सागरिकारूपनिरीक्षणाच्या "नवनवल-नयनोत्सवांत" रंगून गेल्यामुळें वासवदत्तेच्या प्रेमापासून दुरावल्यासारखेंच झालें आहे. केवळ श्लाघ्यान्वया व पट्टाभिषिक्त राज्ञी म्हणून बहुमान, आणि स्वभावतः मानी व रागीट असल्यामुळें भीति,

या भावनांनीं पूर्वीच्या निस्सीम प्रेमाची जागा पटकाविलेली दिसते. "श्वासोत्कंपिनिकंपित कुचयुगे" या श्लोकांत राजानें वासवदत्तेबद्दल आपल्या मनाची स्थिति सुरेख वर्णिलेली आहे. या कालीं समाजाच्या वरच्या वर्गांत तरी स्त्री-दाक्षिण्य कळसास पोंहोंचलें होतंसें दिसतें. प्रद्युम्नाची पूजा सुरू असतां राजा भाटाप्रमाणें वासवदत्तेची स्तुति करून आपल्या नकली प्रेमाचें प्रदर्शनच करितो, असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. नागरिक पुरुष "अन्यसंक्रांतहृदय" झाल्यावर त्यांचें पत्नीविषयींचें दाक्षिण्य द्विगुणित होतें हा कालिदासाचा सिद्धान्त प्रसिद्धच आहे. एक राणी हयात असतां उघडपणें दुसरा प्रेम-संबंध करण्यास उत्सुक झालेल्या वत्सराजासारख्या नायकांसंबंधानें अलीकडील कांहीं विद्वानांचें मत अनुकूल नाहीं. कै० प्रो० राजाराम रा. भागवत यांनीं कालिदासाच्या सर्व नायकांवर (अग्निमित्र, पुरूरवा, दुष्यंत.) "पशुतुल्यवृत्तीचे" असा किंवा अशासारखा शेरा मारल्याचा आठवतो. राजपुरुष व इतर श्रीमंत लोक कालिदास–श्रीहर्षाच्या कालीं अनेक स्त्रियांशीं विवाह करीत व ती रूढि तेव्हां सर्वसंमत होती, हें विसरून विसाव्या शतकांतल्या सुधारलेल्या कसानें त्यांच्या वर्तनाची छाननी करणें अन्यायाचें होईल. "वशिनां हि परपरिग्रहसंश्लेषपराङ्मुखी वृत्तिः" असे बाणेदार उद्गार काढून "भ्रमरविव विभाते कुंदमंतःतुषारं। नच खलु परिभोक्तुम् नैव शक्नोमि हातुम्।" अशी मनाची ओढाताण चालली असतां घरीं चालत आलेल्या स्वर्गीय सौंदर्याचा अव्हेर करण्याचें मनोबल आजकाल किती राजपुरुषांच्या व इतरेजनांच्या अंगांत असेल याचा पूर्ण विचार करूनच मग दुष्यंतासारख्यांवर कडक टीका करणें वाजवी होईल. अनेकपत्नीत्वाची चाल हिंदुधर्मशास्त्रांस संमत आहे हें प्रसिद्धच आहे. या चालीचा विचार करतांना त्यावेळची विशेष परिस्थिति जमेस न धरून चालणार नाहीं. देशामध्यें अतिशय सुबत्ता होती. भुकेबंगाल परकीयांच्या टोळधाडी हिंदुस्तानांत मुक्तद्वारानें शिरण्यास सुरवात झाली नसून देशाच्या विस्ताराच्या मानानें लोकवस्तीही विरळ होती. बाल्यदशेंतच नाकावर चष्मा चढवून चाळिशीच्या आंतच वार्धक्याचा दूरचा पल्ला गांठणारे नरपुंगव केवळ अपवादादाखलच त्या कालीं असतील. उलटपक्षीं जरासंधासारखे ८० वर्षांचे जवान प्रसंगानुसार लंगोट लावून कुस्तीच्या आखाड्यांत उतरण्याची हिंमत बाळगीत. मुलें पोसणें जड झाल्यामुळें "संतति-नियमनाची" लोकांस माहिती देण्यासाठीं उघड शाळा स्थापण्याची कल्पनाही अस्तित्वांत नव्हती. विपुल संतति हें महद्भाग्य समजत

असत. परिचर्या (Nursing) वैद्यकी, यंत्रलेखन, लघुलेखन (typying shorthand) अध्यापन(teaching)वगैरे धंद्यांत बायका पडून आपलें पोट भरूं लागल्या नव्हत्या. शेतकीचा अगर शिपाईगिरीचा सर्वसाधारण व्यवसाय, लढाईचे वारंवार प्रसंग, सामायिक कुटुंबव्यवस्था वगैरे कारणांनीं लोकसंख्येची वाढ कशी होईल ही विवंचना लोकनायकांस सतत होती व त्या अनुरोधानेंच समाजाच्या तत्कालीन नीतिमत्तेचें क्षेत्र बुद्ध्या आंखलें गेलें. ही सर्व परिस्थिति लक्ष्यांत घेतां बहुपत्नीकत्वाची चाल त्या वेळच्या पुरुषांच्या केवळ पशुवृत्तीचि द्योतक होती असें म्हणणें बरेंच धाष्ट्यार्चें आहे. जर्मनीसारख्या आधुनिक सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या राष्ट्रांत लोकसंख्येची वाण भासूं लागल्याबरोबर उघड धर्माज्ञा झुगारून बहुपत्नीकत्वाच्या शक्याशक्यतेचा विचार सुरू असल्याचें ऐकिवांत आहे. बहुपत्नीप्रवणत्वाचा (Polygamous Tendency) दोषखेरीजकरून वत्सराज उदार व मोकळ्या अंतःकरणाचा मायाळू व चतुर असा रेखाटला आहे.

वासवदत्ता (उपनायिका) ही फार मानी व रागीट असली तरी सरळ, मायाळू व किंचित् भोळसर स्वभावाची आहे. आधुनिक विचारसरणीप्रमाणें हें पात्र त्या कालच्या विशिष्ट मानसिक अवनतीचें एक उदाहरण दिसतें. द्वितीय संबंधाला आपण होऊन संमति देऊन हिनें नवऱ्याच्या फाजील विलासीवृत्तीला उघड उघड उत्तेजनच दिलें आहे. वासवदत्ता व मालविकाग्निमित्रांतली धारिणी या एकाच जातीच्या गचाळ बायका दिसतात ! आतांच्या समानहक्कांच्या ज्ञानयुगांत स्त्रिया असला कमकुवतपणा कधींही दाखविणार नाहींत. प्रत्यक्ष मामेबहीण असली म्हणून काय झालें ? नवऱ्याच्या निव्वळ मनःस्वास्थ्यासाठीं किंवा सार्वभौमपदाच्या लालचीनें आपल्या हातानें दारीं सवत आणावी काय ? श्री० सौ० जानकीबाई देसाई यांनीं लिहिलेली 'प्रेमळ सवत' ही कादंबरी कितीही हृदयस्पर्शी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत तिचा काय उपयोग ? इंग्लंड, फ्रान्सप्रमाणें लक्षावधि पोरी अविवाहित राहून सबंध देशाच्या नीतिमत्तेला कीड लागली तरी बेहत्तर, पण स्त्रियांनीं आपल्या वैवाहिक हक्कांवर गदा काय म्हणून आणावी ? या व अशा प्रकारच्या प्रश्नास उत्तर देणें कठिण आहे व त्याचा विचार करण्याचें हें स्थळही नव्हे. धारिणी व वासवदत्ता यांचें वर्तन मानसिक दुर्बलतेचें चिन्ह कीं सात्त्विक पतिभक्तीचा उच्चतम आत्मयज्ञ हें ठरविणें प्रत्येकाच्या मनोरचनेवरच अवलंबून राहणार.

जोडुनियांहि सपत्नी आराधिति पति पतिव्रता महिला।
जैसी महानदी ने इतरहि सरिता स्वयें समुद्राला॥

—मालविका०, अंक ५, श्लोक १७ (भाषांतर)

ही कालिदासोक्ति सर्वांस रुचणें शक्य नाहीं.

नायक व उपनायिका हीं वर्ज्य करितां बाकीच्या पात्रांत वैशिष्ट्य असें कांहींच नाहीं. **सागरिका** (नायिका) ही अल्लड, गरीब व भिडस्त स्वभावाची प्रणयमुग्ध पण सुशील अशी कुमारिका आहे. विदूषक वगैरे इतर पात्रें नेहमींच्याच परिपाठांतलीं आहेत.

या नाटिकेंत लक्ष वेधण्यासारखीं स्थळें म्हणजे **मदनोत्सवाचें वर्णन** (अंक पहिला), **जादूगाराची कारवाई, लढाईचें वर्णन** (अंक तिसरा) हीं होत. पैकीं मदनोत्सवाचें (शिमग्याचें) वर्णन चित्तवेधक आहे. पूर्वी पेशवाईत विशेषतः सवाई माधवराव पेशव्यांच्या गुलजार अमदानींत गाजलेल्या शिमग्याचीं रसभरित वर्णनें अद्याप ऐकूं येतात. ही रूढि आमच्या देशांत फार प्राचीन आहे. या महापर्वणीचा फायदा घेऊन कांहीं उच्छृंखलवृत्तीचीं माणसें बीभत्स व किळसवाणे चाळे करितात हें खरें असलें, तरी शिमग्याच्या पुरातन रूढीबद्दल अलीकडील कांहीं सोवळ्या विद्वानांनीं जें काहूर उठविलें आहे, तें बरेंचसें अज्ञानजन्य व दुराग्रहात्मक आहे असें म्हणावें लागतें. व्रणान्वेषी मिशनऱ्यांनीं हिंदुधर्माच्या प्रचंड व जुनाट प्राकारावर हल्ले चढविण्यासाठीं जीं खिंडारें शोधून काढलीं, त्यांत शिमग्याची रूढि हें एक होतें. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांनीं पराचा कावळा करून 'नेटिवां'-च्या चालीरीतींची निंदा करण्याची हौस मोकाट पुरी करून घेतली. मिशनरींची री ओढण्यांत आपल्या विद्वत्तेचें सारसर्वस्व खर्चीं घालणारी आमच्यांत बरीच मंडळी होती व अजूनही आहे. या बहाद्दरांनीं सत्यान्वेषाच्या भरीस न पडतां ही रूढि व तदनुषंगिक बऱ्यावाईट गोष्टींवर निंदेचा सरसकट बोळा फिरवून हे मोकळे झाले.

शिमग्याची चाल निरनिराळ्या नांवारूपांनीं बहुतेक रानटी व सुधारलेल्या देशांत व इतिहासास ज्ञात असलेल्या समग्र कालावधींत प्रचारांत आहे. ग्रीस, रोम, फ्रान्स व ऑस्ट्रेलियासारख्या सुधारलेल्या देशांत व बारासुंगासारख्या अज्ञान रानटी देशांत ही चाल अनेक रूपांनीं अमलांत आहे. ग्रीक व रोममध्यें Orgy ची चाल होती. ही आमच्या शिमग्याचें विशेष भडक रंगाचें रूपांतर होतें. नाकानें

कादे सोळणाऱ्या इंग्लंडमध्यें "Carnival prefixed to the long fast of Lent", "Celebration of Shrove Sunday", "The Feast of Fools" वगैरे नांवांखालीं आमच्या शिमग्यास सात कोश मार्गे टाकणारे अनेक प्रकार चालू आहेत. "Some go about naked without shame, some crawl on all fours, some on stilts, some imitate animals.

—*Hormayr's Taschenbuch, 1835, p. 255*.

बाह्यतः विचित्र दिसणाऱ्या या रूढीबद्दल "Havelock Ellis" या प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकारानें केलेली तरफदारी मनन करण्यासारखी आहे.

In the great ages of Religion it happens that the severity of the rule of abstinence is more or less deliberately tempered by the permission of occasional outbursts of license. The Churh like all wise legislators recognised that where great impulses had to be cultivated, intercalary days must be appointed in which these impulses and habits may be denied and so learn to hunger anew. It is easy indeed for the narrowly austere person to view such manifestation with a supercilious smile, but in the eyes of the moralist and the philosopher there orgiastic festivals exert a salutary aud preservative influence. (Pages 218 and 219 Psychology of Sex by Hevlock Ellis Vol. VI.) पॅरिसच्या धर्ममंडळापुढें 'Feast of Fools'ची तरफदारी करणाऱ्यांनीं अशाच अर्थाचे उद्गार काढले आहेत. "We do this according tc ancient custom in order that folly which is second nature to man and seems to be inborn may at least once a year have a free outlet."

—*Geschichte des Grotesk-Komischen fourtk Edition, p. 204.*

प्लेटो व सेनेका या ग्रीक व रोमन नीतिशास्त्रज्ञांनीं या रूढीचें अशाच रीतीनें

समर्थन केलें आहे. या विषयाचा जास्त ऊहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. परकी-यांच्या कांहीं विशिष्ट मतलबानें फैलावलेल्या उष्ट्या कल्पनांच्या जोरावर स्वकीयां-वर कठोर व अप्रयोजक टीका करणारी विद्वान् मंडळी जुन्यापुराण्या चालीरीती-च्या मुळाशीं असलेल्या सर्वमान्य तत्त्वांचा शोध लावून त्यांचा समूळ उच्छेद करण्याचा प्रयत्न न करितां त्यांस योग्य वळण लावतील, तर लोकनियंत्रणाचें कार्य जास्त सुलभ होईलसें वाटतें.

या नाटकांत मणिमंत्र, औषधी यांचाही प्रामुख्यानें उल्लेख आहे. मंत्रानें सापा-सारखा भयंकर प्राणी हतवीर्य होऊन निर्जीव दोरखंडाप्रमाणें मंत्र्याच्या पूर्ण कह्यांत वागतो, या चमत्काराचा लेखकास प्रत्यक्ष अनुभव आहे. या मंत्रांचा अर्थ-बोध मुळींच होत नाहीं व भाषाही प्रचलित कोणत्याही भाषांपैकीं नाहीं. एका मंत्र्यास विचारतां त्यानें मंत्रांची भाषा "बर्बरी" म्हणून सांगितलें. मंत्र्यानें पाळावयाचे नियम फारच कडक असतात. आणि हे नियम जेवढ्या कडक शिस्तीनें पाळले जातील तितका मंत्रांचा प्रभाव जास्त! उदाहरणार्थ, ग्रहणाच्या वेळीं वेध लागल्यापासून ग्रहण साफ सुटेपर्यंत फक्त डोकें वर ठेवून पाण्यांत बुडून राहिलें पाहिजे. इतर लहानसहान पुष्कळच निर्बंध आहेत. हल्लींच्या चिकित्सायुगांत या मनोरंजक रहस्याचा कोणी शास्त्रीयरीत्या उलगडा करण्याचा प्रयत्न अद्याप केल्याचें ऐकिवांत नाहीं.

औषधी मण्यासंबंधानें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. हा लेख लिहिला जात असतांनाच "केरवा मणि केरवा" ही घोषणा रस्त्यावर चालू आहे! त्यावरून कांहीं मण्यांच्या अंगीं रोगनिवारक सामर्थ्य आहे, हा जुन्या काळचा विश्वास अनेक शतकांनंतर सुद्धां जीव धरून आहे हें स्पष्ट होतें.

इंद्रजाल–जादूचे प्रयोग हे सध्यांच्या काळीं Mesmerisim, Hypnotisim, Magic या नांवांखालीं चालू आहेतच. पण जुन्या काळीं या कलेंत विशेषच प्रगति असावी असें वाटतें.

लढाईचें वर्णन थोडक्यांत पण उठावदार आहे. त्यावरून खालील गोष्टी स्पष्ट होतात. [१] किल्ल्यांचें अस्तित्व व त्यांचा लढाईंत उपयोग. [२] हत्तींचा लढाईंत उपयोग. (अलेक्झांडर व पोरस यांच्या दरम्यान लढाईंतही हत्तींचा उपयोग केल्याचें प्रसिद्धच आहे. सध्यां Tanks व Armoured cars याचा उपयोग अशाच तऱ्हेनें करतात.) [३] मुख्य हत्यारें धनुष्यबाण व तलवार हींच असावींत, अस्त्रांचाही

उल्लेख आहे; पण त्यांच्याबद्दल विशेष माहिती दिलेली नाहीं. तोफा, बंदुका, दारू-गोळा या कालीं प्रचारांत नव्हतासें दिसतें. राजेरजवाडे व सेनानायक हत्तीवर बसून लढत असत.

संस्कृत काव्याचें समश्लोकी भाषांतर करतांना मुखतः दोन अडचणी उपस्थित होतात. एकतर संस्कृत भाषेच्या एका ओळीच्या टप्प्यांत जितका अर्थबोध समावूं शकतो तितका मराठी दोन ओळींलाही सहसा झेपत नाहीं. संस्कृत कविता समास-प्रचुर व निर्यमक व मराठी कविता साधारणतः समासविमुख व सयमक असल्यामुळें पहिलीचें दुसरींत समश्लोकी भाषांतर करणें बरेंच कठीण जातें. मराठींतही निर्यमक कविता करण्याचा बूट निघाला आहे; पण मराठी वाचकांच्या आजपर्यंत यमकांस लालचावलेल्या कानांस निर्यमक कविता बेचव लागते, त्यास इलाज नाहीं. समश्लोकी भाषांतर करण्याचाच निर्धार ठेविल्यास मूळ संस्कृत कवितेचा तंतोतंत भावार्थ मराठी भाषांतरांत उतरविणें दुरापास्तच आहे. प्रस्तुत भाषांतर श्लोकांच्या बाबतींत तरी शब्दशः झालेलें नाहीं. संस्कृत रत्नावली नाटिकेची ही मराठी प्रति-छाया आहे, हें लक्ष्यांत ठेवून भाषांतर वाचल्यास निराशा होणार नाहींसें वाटतें.

नाटिकेंतल्या गद्याचें भाषांतर चि० आ. शां. देसाई, M. A. यांनीं केलें आहे. हें पुस्तक लक्ष्यपूर्वक वाचून त्यासंबंधीं अनेक उपयुक्त सूचना केल्याबद्दल बडोद्याचे सुभेसाहेब मे० मंगेशराव नाडकर्णी, विल्सन् कॉलेजाचे प्रो० वेलणकर व प्रो० पां. वा. काणे या सद्गृहस्थांचा मी अत्यंत आभारी आहें.

शां. आ. सबनीस

रत्नावली नाटक



चित्र.

Lakshmi Art, Bombay, 8

श्री

रत्नावली नाटिका

अंक पहिला

पादाग्रावरि जी उभी, प्रतिपदीं वांके स्तनांच्या भरें।
शंभूच्या शिरिं वाहण्या स्वकरिं घे पुष्पांजली आदरें॥
येतां सस्पृहलोचनत्रयपथीं जों कंप पावे उमा।
हातींचीं कुसुमें मध्येंच गळलीं, रक्षो सदा ती तुम्हां॥ १

सोत्कंठा प्रियसंगमीं परि न दे लज्जा पुढें जावया।
नेली बंधुवधूजनीं पतिकडे जी धीर देवोनियां॥
मुग्धा पाहुनियां पुढें प्रियकरा सभ्रांत जी पार्वती।
आलिंगी जिस चन्द्रमौलि हंसुनी, देवो तुम्हा क्षेम ती॥ २

* संतप्तें दृष्टिपातें मम शमित क्षणीं ते मखाग्नी निमाले।
उष्णीषें ओढितांही चपल शिवगणीं भीत ऋत्विग् पळाले॥
दक्ष प्रार्थी, विलापे तव जननि तशा फांकले देव खिन्न।
सांगे गौरीस, हांसे, शिव मखमथना हो तुम्हां तो प्रसन्न॥ ३

जय उडु-पतिचा असो, सुरांना।
नमन, नुरो भयलेशही द्विजांना॥

---

* हा श्लोक दक्षयज्ञमथनास उद्देशून आहे.

१ उष्णीष=डोक्यास गुंडाळलेलें वस्त्र.

सुसमृद्धि वरो वसुंधरा ती।
चिर विलसो नृपचंद्र चन्द्रकान्ति॥ ४

[नान्दीनंतर]

सूत्रधार—आतां ईशस्तवन जरा आटोपतें घ्यावें. वसंतोत्सवानिमित्त नाना देशांहून आलेल्या, श्रीहर्षदेवांच्या चरणकमलांचे आश्रित अशा मांडलिक राजांनीं आज बहुमानानें बोलावून आणून मला अशी आज्ञा केली आहे कीं, "हे भरत-पुत्रा, आमचे स्वामी सम्राट् श्रीहर्षदेव यांनीं नितांतनूतनकथाभागानें सजविलेली रत्नावली नांवाची नाटिका रचल्याचें आम्हीं कर्णोपकर्णीं ऐकिलें आहे; परंतु त्या नाटिकेचा रंगभूमीवर प्रयोग आम्हीं अद्याप पाहिला नाहीं. तरी अत्यंत लोकप्रिय अशा महाराजाविषयींच्या आदरानें प्रेरित होऊन व त्याचप्रमाणें आमच्या विनंतीस मान देऊन त्या नाटिकेचा यथायोग्य प्रयोग तूं कर" तेव्हां नाट्यवेषाची रचना करून सर्वांची मनीषा पूर्ण करावयाच्या तयारीस लागावें. शात्रास. सभा-जनांचें सर्व लक्ष आतां माझ्याकडे लागलें आहे यांत बिलकूल संशय नाहीं. कारण,

हर्षाची कविता रसाळ, सुगुणग्राही सभा ही असे।
लोकीं वत्सचरित्र रम्य, अमुचें कौशल्य नाट्यीं तसें॥
आहे यांतिल एक एक गुणही द्याया यशातें पुरा।
मद्भाग्यें जमला इथें सकल हा सांठा गुणांचा खरा॥ ५

चला आतां घरांत जाऊन भार्येला बोलवावी आणि नृत्यगीतास आरंभ करावा. (इकडे तिकडे फिरून व पडद्याकडे पाहून) हेंच आमचें घर; जावेंच आंत (आंत जाऊन) आर्ये, जरा बाहेर ये.

नटी—(बाहेर येऊन) आर्यपुत्रा, ही मी आलें. कोणतें इच्छित कार्य संपादावें त्याविषयीं आज्ञा व्हावी.

सूत्रधार—आर्ये! रत्नावली नाटिकेचा प्रयोग पाहण्यासाठीं उत्सुक असा हा राजलोकसमुदाय पहा! आणि नाट्यवेषाची तयारी कर.

नटी—(विषण्णपणें) आर्यपुत्र! आपणांस कसलीच काळजी नसल्यामुळें नाच आणि गाणं आपणांस सुचावें हें ठीकच आहे. पण माझी बिचारीची एकुलती एक मुलगी, तिचासुद्धां आपण दूर देशींच्या मुलाबरोबर वाग्निश्चय केला आहे, तेव्हां

परदेशींच्या या नवऱ्याबरोबर तिचें पाणिग्रहण होणार तरी कसें या चिंतेनें मला जीवसुद्धां नकोसा झाला आहे. अशा स्थितींत नाचणें कसचें आणि गाणें कसचें!

सूत्रधार—आर्ये! जामात दूरदेशींचा आहे म्हणून कष्टी होण्याचें मुळींच कारण नाहीं पहा.

द्वीपान्तरीं वसोतचि, पृथक् दिशान्तांस, जलधिच्या उदरीं
अभिमत जीवां आणुनि दैव तयां सहज सूत्रबद्ध करी

(पडद्यांत) शाबास, भरतपुत्रा शाबास. बरोबर असेंच! त्यांत काय संशय!
('द्वीपांतरीं' ही आर्या म्हणतो.)

सूत्रधार—(ऐकून हर्षानें) हा पहा माझा धाकटा बंधु यौगंधरायणाची भूमिका घेऊन रंगभूमीवर आलाच. चल तर; आपण पण नाट्यवेषाची तयारी करण्यासाठीं जाऊं. [जातात.

[प्रस्तावना समाप्त.]

[नंतर वर्णनानुरूप यौगंधरायण प्रवेश करितो.]

यौगंधरायण—हो असेंच. यांत काय संशय!('द्वीपांतरीं'ही आर्या पुनः म्हणतो.) अथवा सिद्धपुरुषाच्या भाकितावर विश्वास ठेवून मागणी घातलेली सिंहलेश्वराची कन्या इकडे येत असतां वाटेंत नौका फुटून बुडतांना तिला फळीचा आधार कसा मिळाला असता! तसेंच सिंहलदेशाहून परत येत असलेल्या कौशांबीच्या व्यापाऱ्यानें तिला त्या स्थितींत पाहून कां आश्रय दिला असता आणि गळ्यांत असलेल्या रत्नमालेमुळें तिला ओळखून माझ्याच स्वाधीन कशी बरें केली असती! (आनंदानें) खरोखर सर्व बाजूंनीं स्वामींच्या अभ्युदयाचीं चिन्हें दृष्टीस पडत आहेत. (विचार करून) मीसुद्धां तिच्याविषयीं बहुमान प्रदर्शित करून तिला महाराणीच्या स्वाधीन केलें हें योग्यच केलें. कंचुकी बाभ्रव्य हा पण सिंहलेश्वराचा प्रधान जो वसुभूति त्या सहवर्तमान मोठ्या कष्टानें समुद्राच्या तीरास लागून कोशल देशावर स्वारी करण्यासाठीं पाठविलेल्या रुमण्वताला जाऊन मिळाला असें मीं ऐकिलें आहे; परंतु याप्रमाणें राजकार्य बहुतेक सफल झालेलें पाहूनसुद्धां मला धीर वाटत नाहीं; तेव्हां खरोखरच सेवावृत्ति फारच कठीण आहे; असेंच म्हटलें पाहिजे. पहा

स्वामीसाठीं हा खटाटोप केला।
प्रारब्धेंही साह्य केलें तयाला॥
नाहीं शंका सिद्धिची यांत मातें।
वाटे भीती कीं रुचे हें नृपातें॥ ७

[पडद्यांत आवाज होतात.]

यौगंधरायण—(ऐकून) अरे हा तर कुशलतेनें वाजविलेल्या मृदंगांच्या तालांत मिसळून गेल्यामुळें अधिकच कर्णमधुर झालेला नागरिकांचा संगीत ध्वनि समोरच ऐकूं येत आहे. यावरून मदनाच्या महोत्सवानें वृद्धिंगत झालेला त्यांचा आनंद पाहण्यासाठीं महाराज राजवाड्याकडे निघाले वाटतें. खरेंच ! हे पहा,

* विश्रांत-विग्रह, तसा जनचित्तवासी।
ज्या मित्र एकचि वसंत, रति-प्रियासी॥
सोत्कंठ हा निजमहोत्सवदर्शनाला।
श्रीवत्सराज, मकरध्वजसा निघाला॥ ८

अरे, महाराज तर राजवाड्याच्या उंच गवाक्षांत जाऊन बसले सुद्धां; तर आपण पण घरीं जाऊन अवशिष्ट कार्यासाठीं उपायचिंतन करावें.

[विष्कंभक समाप्त.]

---

*विश्रांतविग्रह—या श्लोकांत उत्प्रेक्षा हा मुख्य अलंकार असून श्लेष त्यास पोषक आहे.

विश्रांतविग्रह—विग्रह हा द्व्यर्थी शब्द आहे. [विग्रह = १ युद्ध. २ शरीर] १ विश्रांत-विग्रह म्हणजे ज्याचा युद्ध व्यवसाय बंद पडला आहे असा राजा वत्सराज; २ विश्रांतविग्रह म्हणजे ज्याचें शरीर नाश पावलें आहे असा मदन.

जनचित्तवासी—[१] लोकप्रिय असा वत्सराज [२] लोकांच्या मनांत जन्म पावणारा:—मनसिज; मनोभव असा मदन. रतिप्रिय–[१] क्रीडाप्रिय वत्सराज [२] रतीचा कांत मदन. वसंतक–[१] राजाचा त्या नांवाचा ब्राह्मण मित्र. [२] वसंत ऋतु, मधुमास; मदन व वसंत हे निकट सहचर असल्याचें सर्वश्रुत आहे.

“श्री वत्सराज मकरध्वजसा निघाला” या उत्प्रेक्षा अलंकाराचा श्लेष पोषक आहे. वेणीसंहारांतही विशेषतः विग्रह या शब्दावर असाच सुंदर श्लेष साधला आहे. (अंक १, श्लोक ७ पहा.)

[नंतर वसंतोत्सवास योग्य पोषाक केलेला राजा व विदूषक बसले आहेत असा पडदा उघडतो.]

राजा—(इकडे तिकडे पाहून आनंदानें) मित्रा वसंतका !

विदूषक—काय म्हणतोस मित्रा ?

राजा—

राज्यीं शत्रु नसे मुळीं, सुसचिवीं मद्भारही अर्पिला।
प्रेमें पाळुनि, दुःख वारुनि, तसा हा लोक संतर्पिला॥
ही प्रद्योत-सुता, वसंतऋतु हा, तूं मित्र, वाटे मला।
माझा उत्सव हा खरा, मदन तो नामेंचि तोषो भला॥ ९

विदूषक—छे मित्रा ! तसें नव्हे. आतांच तूं माझ्यासंबंधानें जे प्रेमोद्गार काढलेस त्यावरून मला तर वाटतें कीं, हा महोत्सव तुझ्यासाठीं नव्हे, किंवा कामदेवासाठीं पण नव्हे; तर तो या ब्राह्मणासाठींच आहे. पण त्याची आतां वाटाघाट कशाला ? या मदन-महोत्सवाची शोभा तर पहा ! वारुणीमुळें बेभान झालेल्या कामिनींनीं आपण होऊन करग्रहण केल्यामुळें आनंदानें नाचणाऱ्या या नागरिकांनीं एकमेकांवर पिचकाऱ्यांतील रंगानें चालविलेल्या माऱ्यामुळें या मदन-महोत्सवाला फारच मजा आली आहे. त्याचप्रमाणें वाटोळ्या मृदंगाचा आणि कर्कश तुतारीचा शब्द एकमेकांत मिसळून रस्त्यांचा पुढील भाग गजबजून गेला असून जिकडे तिकडे ओंजळींनीं फेंकलेल्या गुलालानें सर्व दिशा लालभडक होऊन गेल्या आहेत.

राजा—(आनंदानें इकडे तिकडे पाहून) खरेंच, नागरिकांचा आनंद अगदीं कळसास पोंचलेला दिसतो. इकडे पहा,

हेमालंकार आंगीं रचुनि वरि गळां घालुनी पीतमाळा।
देती शोभा उषेची उधळुनि जन दिक्-प्रांगणीं हे गुलाला॥
कौशांबी पौरवेषें प्रकटधनमदा लाजवी वैभवातें।
वित्तेशाच्या, सुवर्णद्रवखचितजना पीतवर्णांचि वाटे॥ १०

निर्वांगवैरदहनाः प्रशमादरीणां
नन्दन्तु पांडुतनयाः सह माधवेन
रक्तप्रसाधितभुवः क्षतविग्रहाश्च।
स्वस्था भवन्तु कुरुराजसुताः सभृत्याः

आणखी—

धारायंत्र-विनिर्गतें जलभरें हें व्यापिलें प्रांगण।
तेथें कर्दम फार निर्भर-पद-क्षेपें करी हा जन॥
उद्दामा प्रमदा मुदें विहरती त्यांचा गळे जो श्रमें।
संध्यारक्त-कपोललेप, करी तो पादांकितें कुट्टिमें[1]॥ ११

विदूषक—(पाहून) प्रिय मित्रा! इकडे क्रीडाचतुर पुरुषांनीं पाण्यानें भरलेल्या पिचकाऱ्या अंगावर उडविल्यामुळें मनोहर सीत्कार करणाऱ्या या वेश्यांगनांचे हे विलास तर पहा.

राजा—अगदीं खरें! पहा,

होतां दिशा कपिशवर्ण[2] पहा गुलालें।
जो अल्प दृष्टिपथिं ये मणि-रश्मिजालें॥
जो वागवी करिं फणाकृति शृंगकांतें[3]।
पाताल भासवि भुजंगम-सार्थ मातें॥ १२

विदूषक—(पाहून) मित्रा, पहा पहा! ही मदनिका वसंतोत्सवास योग्य अशा तऱ्हेनें, परंतु मदनाधीन झाल्यामुळें किंचित् बेभानपणें, नाचत चूतलतिकेसह इकडेच येत आहे.

[नंतर कामचेष्टा दर्शवीत व द्विपदीखंड गात दोन दासी प्रवेश करितात.]

मदनिका—

दूतचि मदनाचा बाई। आम्रवना फुलवित जाई।
मानिजनांचें करी हंसें। दक्षिणवारा वाहतसे॥
बकुलाशोकां विकसन दे। प्रणयीजन भेटवि मोदें॥
अधीर करिं कामी-जनां हा। कष्टवि युवतिसार्थ अहा!

---

१ फरसबंदी. २ पिंगट रंगाच्या. ३ पिचकाऱ्या.

*हा श्लेषालंकार आहे. मुख्य भर भुजंगमसार्थ या शब्दावर आहे. भुजंग किंवा भुजंगम (१) सर्प, (२) विलासी किंवा स्त्रैण पुरुष. राजाला समोरचा देखावा पातालासारखा भासला. पातालांत सन्धिप्रकाश असल्यामुळें बरोबर दिसत नाहीं, तरी पण तो प्रदेश रत्नमय असल्यामुळें रत्नाच्या तेजामुळें आसपासचे पदार्थ थोडेसे दृग्गोचर होतात व फणा वर उभारून नाग इकडे तिकडे फिरत असतात.

अथवा—

करितो वसंत आधीं जनहृदयें मृदुल वाटतें मातें।
पुष्पशरीं त्यांचा मग सुलभ पडे वेध मदनातें॥ १५

राजा—(निरखून) खरोखरच यांच्या ह्या उत्तान क्रीडा फारच प्रेक्षणीय आहेत पहा.

यत्नें जी पुष्पशोभा रचिलि कचचयीं ती सुटोनी गळाली।
क्षीबेची[1] नृत्यखेदें द्विगुणित-मुखरें नूपुरें हीं जहालीं॥
गत्युत्कंपें उरातें सतत बडवितो हार हा व्यस्त[2] पाहीं।
मध्यांगीं भग्न होई स्तन-भर-नमिता, भान तन्वीस नाहीं॥ १६

विदूषक—मित्रा! मी पण या दासीजनांच्यामध्यें नाचून मदनाच्या उत्सवाचा जरा सन्मान करितों.

राजा—(हंसून) मित्रा, तसेंच कर.

विदूषक—बरें तर. (जाऊन त्या दोन दासींमध्यें नाचतो.) हे मदनिके, हे चूतलतिके, मला पण ही जरा चर्चरी शिकवा बघूं.

दोघी—अरे खुळ्या, ही चर्चरी नव्हे. द्विपदीखण्ड[3] असें याला म्हणतात.

विदूषक—(हर्षानें) काय, या साखरेचे लाडू बनवतां येतात!

मदनिका—(हंसून) छेः, छेः, हें खण्ड पाठ करावयाचें.

विदूषक—(खेदानें) पाठ करावयाचें असल्यास राहूं द्या तें एका बाजूला. मी आपला परत प्रियमित्राकडे जातों.

दोघी—वसंतका, अरे चाललास कुठें! चल, आपण जरा मौज करूं या.

[दोघी विदूषकाची ओढाताण करितात. तो कसाबसा सुटून पळून जातो.]

मदनमहोत्सवाच्या देखाव्यांत अपरिमित गुलाल उधळल्यामुळें दिशा धुंद होऊन सन्धिप्रकाश पडल्यासारखा झाला आहे. तरी पण विलासप्रिय पुरुषांच्या अंगावरील भूषणांच्या प्रभेनेंच थोडथोडें दिसूं लागतें आणि त्यांच्या हातांतील रंग उडविण्यासाठीं उंच केलेल्या पिचकाऱ्या सापांच्या फणांसारख्या दिसतात.

१ क्षीबा = दारु पिवून झिंगलेली. २ नेहमींच्या जागेवरून (स्तनभागावरून ढळलेला). ३ द्विपदीखण्ड हें एका वृत्ताचें नांव आहे; खण्ड या शब्दाचा अर्थ "साखर" असाही आहे. शब्द सादृश्यामुळें खादाड विदूषकाचा गोंधळ होतो.

विदूषक—(राजाकडे जाऊन) मित्रा, जाऊन नाचलों. छे, तसं नव्हे, जरा खेळ खेळून पळून आलों.

राजा—छान केलेंस.

चूतलतिका—मदनिके, बराच वेळ आपण गडे मौज केली. चल आतां जाऊन राणीसरकारचा निरोप महाराजांना कळवूं या.

मदनिका—खरंच. चल लवकर.

दोघी—(राजाजवळ जाऊन) महाराजांचा जयजयकार असो ! महाराज, देवीची अशी आज्ञा आहे कीं, (मध्येंच जीभ चावून व लाजून) छे, छे, अशी विनंति आहे.

राजा—(आनंदानें हंसून, आदरानें) कांहीं हरकत नाहीं. आज्ञा शब्दच बरा दिसतो आणि आजच्या वसंतोत्सवाच्या दिवशीं तर विशेषच. तर सांगा बघूं काय देवीची आज्ञा आहे ती.

विदूषक—वा ! बटकीचे पोरी ! देवी आज्ञा करते काय ?

दोघी—महाराज, देवीची अशी विनंति आहे कीं, " आज मला मकरन्दोद्यानांत जाऊन अशोकवृक्षाच्या मुळाशीं प्रतिष्ठापन केलेल्या भगवान् कुसुमायुधाची पूजा करावयाची आहे; तरी महाराजांनीं त्या वेळीं तेथें येण्याची कृपा करावी.

राजा—(आनंदानें) मित्रा, एक संपला नाहीं तोंच हा दुसरा उत्सव.


विदूषक—चल तर मग जरा लवकरच जाऊं. कारण तेथें या भिक्षुकाच्या बच्चाला मंगल प्रसंगीं कांहीं तरी वाण मिळेलच.

राजा—मदनिके, जा देवीला जाऊन कळव कीं, मी हा मकरंदोद्यानांत आलोंच म्हणून.

दोघी—जशी महाराजांची आज्ञा [जातात.

राजा—मित्रा, चल तर मग मकरंदोद्यानांत; हो बघूं पुढें.

विदूषक—चलावें महाराज. (थोडें पुढें चालून व समोर पाहून) हें आलेंच मकरंदोद्यान. चल तर आंत प्रवेश करूं (प्रवेश करून व पाहून विस्मयानें) पहा पहा महाराज ! हें मकरंदोद्यान जणुं काय मलयमारुतानें हालत असलेल्या आणि मोहरांनीं भरून गेलेल्या आम्रवृक्षांच्या परागांची पायघडी घालून व मत्त



आमंत्रण.

Lakshmi Art, Bombay, 8

मधुकरांचा गुंजारव आणि कोकिलांचें गायन यांच्या मिश्र संगीतानें, आपला आदर-सत्कारच करीत आहे असें वाटतें तर आपण आतां प्रवेश करावा.

राजा—(इकडेतिकडे पाहून) काय ही मकरंदोद्यानाची उत्कृष्ट शोभा! इकडे तर—

* देई नूतन पल्लवोद्गम जयां लाली प्रवालापरी।
भृंगांच्या विरुतें गमे अविशदा जे बोलती वैखरी॥
शाखांतें मलयानिलें डुलवितां भ्रांती जणों पावले।
लाभोनी मधुयोग हे तरु पहा उन्मत्तसे भासले॥ १७

आणखी—

घाला गंडूषसेकें बकुल पसरि हा पुष्पशय्या स्वमूलीं।
मध्वारक्ताननीं ही अधिक तरुणिच्या शोभली चंपकाली॥
पादाघातें अशोकीं उठति युवतिच्या नाद जे पैंजणांचे।
भृंगाली मंजुगीतें अनुकरण करी वाटतें कीं तयांचें॥ १८

विदूषक–(ऐकून) मित्रा ! हा कांहीं नूपुरांच्या आवाजाचें अनुकरण करणाऱ्या भ्रमरांचा शब्द नव्हे. देवीच्या परिजनांच्या नुपूरांचाच हा आवाज ऐकूं येत आहे.

राजा—बरोबर आहे तुझें म्हणणें.

[नंतर मौल्यवान वस्त्रें परिधान केलेली वासवदत्ता, कांचनमाला व पूजासाहित्य हातांत घेतलेली सागरिका प्रवेश करतात.]

वासवदत्ता—कांचनमाले, मकरंदोद्यानाचा मार्ग दाखीव बघूं.

कांचनमाला—इकडून यावें राणीसाहेब.

वासवदत्ता—कांचनमाले, ज्याच्या मुळाशीं प्रतिष्ठापन केलेल्या भगवान् कुसुमायुधाची पूजा मला करावयाची तो रक्ताशोक कितीसा दूर आहे?

*अलंकार श्लेष व उत्प्रेक्षा हे आहेत. मुख्य भर "मधुयोग" या शब्दावर आहे. मधु म्हणजे (१) वसंत ऋतु. (२) सुरा, दारू. वसंत ऋतूंत वृक्षांची अवस्था वारुणी पिऊन झिंगलेल्या सुराभक्ताप्रमाणें झाली आहे हा श्लोकांचा सारांश; तोंडावर लाली, अस्पष्ट शब्द, गतिभ्रम या झिंगलेल्या माणसाच्या मुख्य खुणा आहेत.

१ मधुपानानें आरक्त जाहलेल्या.

कांचनमाला—देवी, जवळच आहे. आपणच नाहीं का पहात ? ही दाट फुलांनीं भरल्यामुळें शोभणारी आपली आवडती माधवीलता आणि ही पहा महाराजांची आवडती नवमालिका. हिलाच अशा अवेळीं सुद्धां फुलें यावीं म्हणून महाराजांनीं कोण खटपट चालविली आहे ! हिच्या जरा पुढें गेलें म्हणजे जिथें राणी सरकारांना पूजा करावयाची तो रक्ताशोक दिसूं लागेल.

वासवदत्ता—चल तर, जरा पाय उचल.

कांचनमाला—चलावें सरकार. (जरा चालतात.)

वासवदत्ता—हाच तो रक्ताशोक इथेंच मला पूजा करावयाची. आण पाहूं कुठें पूजासाहित्य आहे तें.

सागरिका—(पुढें होऊन) सरकार. हें सर्व तयार आहे.

वासवदत्ता—(तिच्याकडे पाहून स्वगत) केवढी पण ही दासींची घोड-चूक ! ज्यांच्या दृष्टीला पडूं नये म्हणून माझी एवढी खटपट त्यांच्याच दृष्टीला आतां ही पडणार. बरें तर मी आतां असेंच करतें. (उघड) सागरिके, मदनाच्या महोत्सवांत सगळ्या दासी गुंग झाल्या असतां, माझ्या सारिकेला एकटी टाकून तूं आजच इकडे कां बरें आलीस ? जा बघूं तिकडे लवकर; हें सर्व पूजासाहित्य या कांचनमालेकडे दे.

सागरिका—जशी देवीची आज्ञा. (थोडें दूर जाऊन) सारिकेला तर मीं सुसंगतेच्या स्वाधीन केलीच आहे. इकडील मदनाची पूजा माझ्या बाबांच्या अन्तःपुरांतल्या प्रमाणेच करतात, कीं दुसरी कांहीं पूजेची रीत आहे, हें पहाण्याची माझी फार इच्छा आहे, तर आतां पूजेची वेळ होईपर्यंत भगवान् कुसुमायुधासाठीं मी पण थोडीं फुलें जमवितें.

वासवदत्ता—कांचनमाले, भगवान् प्रद्युम्नाची अशोकाच्यां मुळाशीं प्रतिष्ठापना कर बघूं.

कांचनमाला—जशी राणीसाहेबांची आज्ञा. (त्याप्रमाणें करते.)

विदूषक—(फिरून व पाहून) मित्रा, नूपुरांचा शब्द आतां ऐकूं येईनासा झाला. त्यावरून देवी अशोकवृक्षाजवळ जाऊन पोहोंचली असें वाटतें.

राजा—मित्रा, बरोबर ताडलेंस; ही पहा देवी.

कुसुम-सुकुमार-तनु ही, कटिभागीं कृशतरा, दिसे नियमें।
शुचि-शीला, रतिपतिच्या जवळी जणुं चापयष्टि मजसि गमें॥ १९

चल तर आपण आतां जवळ जाऊं. (जाऊन) प्रिये वासवदत्ते !

वासवदत्ता—(पाहून) काय आर्यपुत्रांची स्वारी ! महाराजांचा जयजयकार असो. महाराजांनीं आसनस्थ होऊन या स्थानाला शोभा आणावी. हें पहा आसन. बसावें महाराजांनीं. (राजा बसतो.)

कांचनमाला—राणीसाहेब, सुशोभित केलेल्या या अशोक वृक्षाजवळ जाऊन आपल्या स्वतःच्या हातांनीं फुलें, कुंकुम, चंदन व वस्त्रें घालून भगवान प्रद्युम्नाची पूजा करावी.

वासवदत्ता—कांचनमाले, आण पाहूं तें पूजासाहित्य. (कांचनमाला देते. राणी पूजा करते.)

राजा—प्रिये !

प्रत्यग्र-मज्जनभवा तव कांति साजे।
कौसुंभरागवसनें सुषमा विराजे॥
पाहोनि मग्न तुज मन्मथ-पूजनांत।
शाखाचि बालतरुची स्मरली मनांत॥ २०

आणि

स्मरपूजनिं रत असतां करकमलें स्पर्शिला अशोक तुवां।
फुटला जणु मज वाटे मृदुतर किसलय द्रुजाचि यासि नवा॥ २१

मला वाटतें,

हा अनंग अनंगत्वें आजि उद्विग्न जाहला।
कीं, तया तव कल्याणि ! पाणिस्पर्श न लाभला॥ २२

कांचनमाला—देवी, भगवान् प्रद्युम्नाची पूजा संपलीना ? आतां महाराजांचा पूजासत्कार करावा.

वासवदत्ता—तीं फुलें आणि तें गंध आण पाहूं इकडे.

कांचनमाला—हें सर्व तयार आहे सरकार.

[वासवदत्ता राजाची पूजा करते.]

सागरिका—(फुलांनीं ओंजळ भरलेली) अगबाई ! या फुलांनीं मन मोहिल्या-

मुळें ती वेंचण्यांत किती तरी वेळ मीं घालविला म्हणायचा! आतां या सिंधुवार वृक्षाच्या आड उभें राहून पहावें काय चाललें आहे तें. हें काय? अशा प्रकारचा मदन मीं तर बाई कुठेंच पाहिला नव्हता! माझ्या बाबांच्या अंतःपुरांत चित्रांत काढलेल्या मदनाची पूजा करितात आणि इथें तर प्रत्यक्ष मदनाचेंच दर्शन झालें. बरें तर आतां ह्या जमविलेल्या फुलांनीं इथेंच उभी राहून मी कुसुमायुधाची पूजा करतें. (फुलें वाहते.) देवा रतिपते, मी तुला नमस्कार करतें; तुझें दर्शन मला शुभदायक होवो आज माझ्या डोळ्यांचें अगदीं सार्थक झालें. तुझ्या दर्शनाचें फळ खात्रीनें मला मिळणार. (नमस्कार करते.) पण हें काय? एकदां पाहिलें तरी कांहीं तृप्ति होत नाहीं. एकसारखें पहातच रहावें असें वाटतें, परंतु आतां कुणाच्या दृष्टीस पडण्याच्या अगोदर मला गेलेंच पाहिजे. (जाऊं लागते.)

कांचनमाला—आर्य वसंतक! आपण पण आतां या स्वस्तिवायनाचा स्वीकार करावा.

[विदूषक पुढें सरतो.]

वासवदत्ता—(गंध, फुलें व वस्त्रभूषणें घालून) आर्या वसंतका, हें वायन घ्यावें.

विदूषक—(आनंदानें घेऊन) देवीचें कल्याण असो.

[पडद्यांत भाट मोठ्यानें म्हणतो.]

जातां पार निरस्त-तेज सविता अस्ताचला सोडुनी।
द्वारीं हा नृपसंघ ये उदयना! सोत्कंठ त्वद्दर्शनीं॥
देती जे नयनोत्सवा, हरिति जे रक्तोत्पलांची कला।
त्या पादां तव, जेविं चंद्रकिरणां, सेवावया पातला॥ २३

सागरिका—(ऐकून आनंदानें मागें फिरून राजाकडे सतृष्ण नजरेनें पहात) काय? ज्यांच्याबरोबर बाबांनीं माझा वाङ्निश्चय केला तेच का हे उदयनमहाराज! यांना पाहून परसेवेनें कष्टलेल्या माझ्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें झालें आहे.

राजा—काय, उत्सवांत मन गुंतल्यामुळें संध्याकाळ झालेलीसुद्धां आमच्या लक्षांत आली नाहीं. देवि, इकडे तर पहा.

उदयतिरोहित-शशितें सुचवितसे पाण्डुरप्रभा प्राची।
साक्ष जशी दे ललना विवर्ण-वदना हृदिस्थ रमणाची॥ २४



प्रथम दर्शन.

Lakshmi Art, Bombay, 8

चल, देवि, आतां आपण आंतच जाऊं.

[सर्व उठून चालतात.]

सागरिका—काय ! देवी निघाली वाटतं ? बरं तर, मला अधिकच घाईनं गेलें पाहिजे. मला मंदभागिनीला यांच्याकडे डोळे भरूनसुद्धां पहातां येऊं नये ना!

[जाते.

राजा—(जरा चालून)

देवी ! त्वन्मुखपंकजा निरखितां शीतांशु लाजे मनीं ।
पद्में निर्जितदर्प हीं, हरपली शोभा तयांची क्षणी ॥
गीतें त्वत्परिवार-वारवनिता गातात ऐकोनि तीं ।
व्रीडार्ता मुकुलांतरीं दडति या भृंगांगना संप्रति ॥ २५

[सर्व जातात.

'मदनमहोत्सव' नांवाचा पहिला अंक समाप्त

अंक दुसरा

[सारिकेचा पिंजरा हातांत घेऊन सुसंगता प्रवेश करते.]

सुसंगता—छेः, दमलें बाई अगदीं ! ह्या सारिकेला माझ्या स्वाधीन करून गेली तरी कुठं ही सागरिका ? कुठं आतां शोधावी तिला ? (समोर पाहून) ही निपुणिका इकडेच येत आहे. तिला तरी विचारून पहावें.

[निपुणिका प्रवेश करते.]

निपुणिका—(प्रवेश करून) काय तरी बाई आश्चर्य ! या देवतेचा प्रभाव तर कांहीं विलक्षणच दिसतो. महाराजांसंबंधीं सर्व माहिती मला मिळालीच आहे. आतां देवीला जाऊन कळवितें. (जाऊं लागते.)

सुसंगता—(पुढें होऊन) गडे निपुणिके, तुझ्या समोरच मी ही उभी आहें; पण माझ्याकडे न पाहतां चाललीस तरी कुठें एवढया घाईनें ? आणि अगदीं चकित झाल्यासारखी कां दिसतेस ?

निपुणिका—कोण ? सुसंगता ! गडे सुसंगते, बरोबर ओळखलंस बाई. आश्चर्याचं कारण सांगतें तुला. अग, श्रीपर्वतावरून कुणी एक श्रीकंठ नांवाचा सिद्धपुरुष आला आहे म्हणे. आणि त्याच्याजवळून लतांना अकालीं फुलें येण्याचा मंत्र शिकून घेऊन महाराज आपल्या आवडत्या नवमालिकालतेला फुलांनीं अगदीं भरून टाकणार अशी बातमी आहे. तरी याविषयींची सर्व चौकशी करण्यासाठीं देवीनें मला पाठविली होती. बरं, तूं कुठं निघालीस ?

सुसंगता—मी माझ्या प्रिय मैत्रिणीला–सागरिकेला शोधतें आहें.

निपुणिका—गडे तुझी प्रियसखी सागरिका हातांत चित्रफलक, कुंचल्या व रंगपात्र घेऊन कदली-वनांत शिरतांना आतांच मीं पाहिली. तिचा चेहरा पण जरा खिन्नच दिसला. बरें तर, आतां तूं जा तिच्याकडे. मी पण देवीकडे जातें.

[दोघी जातात.

[नंतर हातांत चित्रफलक आणि कुंचल्या घेऊन मदनबाधा झालेली
सागरिका प्रवेश करते.]

सागरिका—मना, थोडा विचार कर. दुर्लभ माणसाच्या ठिकाणीं अनुराग जडल्याचें फळ, व्यर्थ तळमळीशिवाय दुसरें काय बरें मिळणार! आणि शिवाय ज्याच्या एक वेळच्याच दर्शनानें तुला या यातना सहन कराव्या लागत आहेत त्यांनाच पुन्हा परत पहाण्याची तुला अनिवार उत्कंठा लागावी या तुझ्या मूर्ख-पणाला म्हणावें तरी काय? मना, तूं खरोखरच निष्ठुर आहेस. असं पहा, जन्मा-पासूनची तुझी माझी सांगड, अद्यापपर्यंत आपण एकाच ठिकाणीं वाढलों. आणि असें असतांना, या आजन्म सहचरीला टाकून, क्षणमात्र दर्शनानें परिचित झालेल्या माणसाकडे निघून जातांना तुला मुळींच लाज वाटूं नये अं! अथवा यांत तुझा तरी काय दोष? मदनाच्या बाणाला भिऊन तुझ्याकडून, असें वर्तन झालें असावें. (रडत) मदनाची तरी जरा कानउघाडणी करून पहातें. (हात जोडून) देवा कुसुमायुधा! सगळ्या देव दैत्यांना जिंकणारा पराक्रमी वीर तूंच ना! मग अबलांवर बाण टाकतांना तुला कमीपणा कसा वाटत नाहीं? (निश्वास टाकून) अथवा तुला शरीरच नाहीं मग मन कुठून असणार? मला मात्र मंद-भागिनीला या यातनांनीं तळमळून मरण्यापलीकडे दुसरी गति नाहीं. (चित्रफलकाकडे पाहून) बरें तर जोंवर इथें कोणी आलें नाहीं तोंपर्यंत या चित्रफलकावर त्यांची प्रतिकृति काढून एकदां डोळे भरून पहातें मग पुढचें पुढें. (खांत्रास टेंकून एकाग्र चित्तानें चित्रफलक हातांत घेते; निश्वास टाकून) भीतीनें व उत्कंठेनें माझा हात कसा कांपत आहे. पण दर्शनाचा दुसरा उपायच नसल्यामुळें जसें येईल तसें काढून एकदां पाहून तरी घेतें.

[चित्र काढल्यासारखें दाखविते. **सुसंगता** प्रवेश करते.]

सुसंगता—हेंच तें कदलीगृह. आतां आंत शिरावें. (प्रवेश करते व पाहून आश्चर्यानें) ही पहा माझी प्रियसखी सागरिका! कोणत्या तरी नादांत पूर्णपणें मग्न होऊन ही काय बरें लिहीत आहे? मी आल्याचें हिला भान पण नाहीं. ठीक आहे. हिच्या दृष्टीस न पडतां ही काय लिहीत आहे तें तर पहावें. (पाठीमागें उभी राहते; पाहून हर्षानें) काय! हिनें तर महाराजांचें चित्र काढलें! शाबास सागरिके, शाबास! अथवा यांत आश्चर्य कसचें? कारण प्रफुल्ल कमलांनीं भरलेल्या जलाशया-शिवाय दुसरीकडे राजहंसीचें मन कसें रमेल?

सागरिका—(डोळ्यांत अश्रु आणून) काढलें एकदांचें त्यांचें चित्र. पण एकसारख्या येणाऱ्या अश्रूंनीं डोळे भरून गेल्यामुळें मला तें नीट पहातां सुद्धां येत नाहीं. (अश्रु पुसण्यासाठीं तोंड वर करते; सुसंगतेला पाहून घाईघाईनें चित्र-फलक लपविते. थोडें हंसून) कोण सुसंगता! ये गडे बैस इथें.

सुसंगता—(बसते. चित्रफलक जबरीनें काढून घेऊन) या चित्रफलकावर कोणाचें हें चित्र काढलें आहेस?

सागरिका—अग, जिकडे तिकडे मदनमहोत्सव चालला आहे म्हणून सहज मदनाचें चित्र काढलें.

सुसंगता—शाबास तुझी! चित्र सुरेख आहे पण अगदीं ओकं ओकं नाहीं का दिसत? मी मदनाच्या शेजारीं रतीचें चित्र काढून या चित्राला शोभा येईल असें करतें. (कुंचली घेऊन सागरिकेचें चित्र काढते.)

सागरिका—(पाहून रागानें) सुसंगते, माझें चित्र तूं इथें कशालाग काढलेंस?

सुसंगता—(हंसून) रागावण्यासारखं काय झालं त्यांत? जसा तुझा कामदेव तशी माझी रति. तेव्हां हें बघ, ही लपवालपवी दे आतां सोडून आणि सांग बघूं काय प्रकार घडला तो.

सागरिका—(लाजून स्वतःशीं) कळलं वाटतं सगळं हिला! (सुसंगतेचा हात आपल्या हातांत घेऊन) गडे, मला कीं नाहीं लाजेनं अगदीं मेल्यासारखं झालं आहे. तूं दुसऱ्या कुणाला ही गोष्ट नाहीं ना सांगणार?

सुसंगता—त्यांत कसची लाज? तुझ्यासारख्या कन्यारत्नाचा अशाच वराच्या ठिकाणीं अनुराग जडायचा. दुसऱ्या कुणाला ही हकीकत समजणार नाहीं अशी मी तजवीज ठेवीन. ही चतुर सारिका मात्र कदाचित् सर्व गोष्टी उघडकीला आणील. आपण उच्चारलेले शब्द ध्यानांत ठेवून ही कोणाच्या तरी समोर बडबडत सुटेल.

सागरिका—(दुःखानें) माझी तर तळमळ आतां अधिकच वाढूं लागली.

[मदनबाधा झाल्यासारखें दाखविते.]

सुसंगता—(तिच्या छातीवर हात ठेवून) सखे, सावध हो! सावध हो! मी त्या पुष्करिणींतल्या कमळांचीं पानें व मृणालिका घेऊन लौकर येतें. (जाऊन

परत येते व आणलेल्या कमळांच्या पानांची शय्या तयार करते. त्यावर कांहीं मृणालिका पसरून बाकी राहिलेलीं सागरिकेच्या छातीवर ठेवते.)

सागरिका—सखे, काढून टाक तीं कमळाचीं पानें आणि मृणालिका. यांनीं काय होणार ? तूं उगीच स्वतःला त्रास करून घेत आहेस.

अनुराग दुर्लभ-जनीं, लज्जा बहु, देह सखि पराधीन ।
प्रेम विषम, मरणचि या उपाय गे, अन्य कांहीं न ॥ १

[पडद्यांत गडबड.]

*कंठीं लोळे जयाच्या त्रुटित-परिसरा शृंखला सोनियांची ।
स्वेच्छेनें बागडे तैं कलरव करिती घुंगुरें यत्पदांचीं ॥
भ्याल्या रामा जयातें, अनुसरति जया अश्वपाल त्वरें ते ।
प्रासादीं धीट धांवे कपि नर-पतिच्या लंघुनी मंदुरेतें ॥ २

आणखी—

*केलें वर्षवरीं पलायन, नसे ज्यां धैर्य ठावें जरा ।
वस्त्रीं कंचुकिच्याचि वामन शिरे त्राणार्थ हा बावरा ॥
गेले दूर किरात सार्थ अपुल्या नामा कराया जनीं ।
कीं पाहो न कपी, म्हणोनि कुबडे जाती हळू वांकुनी ॥

सुसंगता—(ऐकून समोर पाहून गडबडीनें उठते व सागरिकेच्या हातास धरून) गडे, ऊठ लवकर. तो पहा दुष्ट वानर इकडेच येत आहे.

सागरिका—आतां काय करूंया !

सुसंगता—चल ये, या तमालतरूच्या बाजूला अंधारांत उभ्या राहूं, म्हणजे निघून जाईल तो. (दोघी भयानें इकडे तिकडे पहात एका बाजूला उभ्या राहतात.)

सागरिका—अग सुसंगते, तूं तो चित्रफलक तर तिथेंच टाकलास ! कोणीं पाहिला म्हणजे !

---

१ विषम=प्रेमविषय अत्युच्च दर्जाचा असल्यामुळें असमान. २ मंदुरा=अश्वशाला. ३ वर्षवर=खोजे, नपुंसक. ४ वामन=ठेंगणा माणूस. ५ किरात या शब्दाचा अर्थ जागोजागीं भटकणारे. (कॄ+अतंति).

* या दोन्ही श्लोकांचा “ स्वभावोक्ति ” अलंकार आहे.

सुसंगता—बरी ग बाई तूं! अग, चित्रफलकाचं काय घेऊन बसलीस या वेळीं! दहींभातासाठीं त्या मेल्या दुष्ट वानरानं उघडून टाकलेला तो पिंजरा नाहीं तूं पहात? ती पहा चतुर सारिका उडून चालली! चल, आपण लवकर तिच्या मागून जाऊं. आमचं सर्व बोलणं हिनं ऐकलेलं आहे, तें कुणासमोर बसून बडबडावयाची!

सागरिका—सखे, चल तसेंच करूं या!

[पडद्यांत—काय पण आश्चर्य! काय पण आश्चर्य!]

सागरिका—(पुढें पाहून) सुसंगते, तो दुष्ट वानर परत येतो आहेसें वाटतें.

सुसंगता—(पाहून हंसते.) अग भित्रे, उगीच कां घाबरतेस? अग, हा महाराजांचा नेहमींचा सोबती आर्य वसंतक. [वसंतक प्रवेश करतो.

वसंतक—वाहवा रे वाहवा! काय पण चमत्कार! शाबास! श्रीखण्डदास, शाबास आहे तुझी!

सागरिका—(कौतुकानें निरखून) गडे सुसंगते, बघण्यासारखी ही स्वारी आहे अगदीं!

सुसंगता—अग खुळे, याला पाहून काय उपयोग? सारिका बरीच दूर गेली. चल तर तिच्या मागून जाऊं या. [दोघी जातात.

वसंतक—शाबास! श्रीखंडदास, धन्य आहे तुझी! त्यानें दिलेल्या मंत्राचा उपयोग केला मात्र, नवमालिका तानडतोब अशी बनली कीं सर्व पानें आणि फांद्या दाट फुलांनीं भरून गेल्यामुळें ही देवीच्या आवडत्या माधवीलतेला उपहासानें हंसत आहे असें वाटतें; तर अगोदर जाऊन ही बातमी प्रियमित्राला कळवितों. (पाहून) अरे, हा तर प्रियमित्र इकडेच येत आहे. सिद्ध पुरुषांच्या मंत्रावर पूर्णपणें विश्वास असल्यामुळें नवमालिका जरी दृष्टीआड असली तरी सुद्धां फुलांनीं आच्छादिलेली तिला प्रत्यक्ष पहात असल्याप्रमाणें याचे डोळे पहा कसे आनंदानें विकसित झाले आहेत. बरें तर, आतां याच्या समोर जावें. [पुढें होतो.

राजा—(आनंदानें)

* जोमानें कलिका जिची विकसली, जी जाहली पांडुरा।
पावे जी श्वसनें रुजा, झणिं वरी जी यौवनाच्या भरा॥
दावोनी लतिका अशी, समदना सोत्कंठ कीं भामिनी।
कोपाचा सखिच्या बळें अरुणिमा आणीन मी आननीं॥

वसंतक—(एकदम पुढें होऊन) मित्रा, तुझा विजय असो! खरोखर आज तुझें अभिनंदनच केलें पाहिजे. सांगितल्याप्रमाणें दोहद पुरविले मात्र आणि मग काय नवमालिकेची स्थिति पालटली म्हणून सांगूं तुला! आतां दाट फुलांनीं फांद्या आच्छादल्यामुळें, देवीच्या माधवी लतेचा ती उपहासच करीत आहे असा भास होतो.

राजा—यांत काय संशय? मण्यांचा, औषधींचा आणि मंत्रांचा प्रभावच कांहीं अगम्य आहे पहा—

पाहोनी रिपु लोपले प्रभुगळां श्री कौस्तुभाची द्युती।
सन्मंत्रप्रभवेंचि सर्प जगतीं निर्वीर्यसे वागती॥
पूर्वी लक्ष्मणजीसवें निवटिले जे मेघनादें बली।
त्या वीरां उठवावया गुणवती दिव्यौषधी जाहली॥

चल तर तिकडे जाण्याचा मार्ग दाखव पाहूं. डोळे भरून पाहूंया तरी.

वसंतक—(गर्वानें) या रस्त्यानें चलावें महाराज. [दोघे डौलानें पुढें जातात.

वसंतक—(कांहीं ऐकून मागें वळतो व राजाचा हात घट्ट धरून भीतीनें) चल मित्रा, चल पळून जाऊं.

राजा—कां!

वसंतक—अरे, या बकुल वृक्षावर कुणीतरी भूत आहे!

राजा—चल मूर्खा! निःशंकपणें चल. भूताखेतांचीं अशा ठिकाणीं कुठून वसति असणार!

---

* अलंकार श्लेष व उपमा. कलिकाः—[१] कलिकासंघ, कळ्यांचा बहर. [२] यौवनोन्मेष, यौवनाची शोभा.

पांडुराः-[१] फुलांनीं डंवरल्यामुळें सफेत रंगाची, [२] मदनपीडेमुळें फिक्कट.

श्वसनः-[१] वारा, फुलांनीं भरून गेलेल्या लतेला वाऱ्यानें जास्त त्रास होतो.

[२] निश्वासः—मदनबाधेचें चिन्ह.

लता व नवयौवनवती युवती यांची तुलना मनोहर आहे.

वसंतक—अरे भूत. अगदीं भूत! पहा कसें स्पष्टपणें बोलत आहे! जर माझ्या बोलण्यावर विश्वास नसेल तर हो पुढें आणि ऐक.

राजा—(पुढें होऊन व ऐकून)

> **न जाते दूर ऐकाया लघुत्वें, स्पष्ट ही तरी।**
> **स्त्रीभावें मधुरा, वाटे सारिकेचीच वैखरी॥**

(वर नीट निरखून पाहून) अरे, ही तर सारिका.

वसंतक—(विचार करून) काय खरेंच सारिका?

राजा—(हंसून) अगदीं खरें.

वसंतक—मित्रा, काय पण तूं भित्रा आहेस? सारिकासुद्धां तुला भूत म्हणून वाटलीना?

राजा—काय मूर्ख आहेस तूं! स्वतः करून माझ्यावरच लोटतोस?

वसंतक—ठीक आहे तर मग. मला अडवूं नकोस. (रागानें काठी वर करून) बटकीचे पोरी, हा वसंतक भित्रा आहे असें तुला खरोखरच वाटलें नाहीं का? जरा थांब म्हणजे दुष्ट जनांच्या हृदयाप्रमाणें वांकड्या या काठीनें कवठीचें फळ पाडावें त्याप्रमाणें तुला मारून खालीं पाडतों.

राजा—(त्याला आंवरून) मूर्खा! ती पहा कांहीं तरी गोड बोलूं लागली, कशाला तिला त्रास देतोस? थांब, आपण ऐकूं या.

[दोघेजण ऐकत उभे रहातात.]

वसंतक—अरे! ती असें म्हणते आहे कीं, या ब्राह्मणाला चांगलें चमचमीत जेवण घाल म्हणून.

राजा—खादाड माणसाला जेवणाशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं. बरें, आतां खरें सांग पाहूं? काय म्हणाली सारिका?

वसंतक—मित्रा! तूं तर ऐकलंसच ही काय म्हणाली तें! ही म्हणते, "कोणाचें गडे तूं चित्र काढलेस हें?" "मदनमहोत्सव चालला आहे म्हणून सहज आपलें मदनाचें चित्र काढलें." पुन्हा ही म्हणते, "माझें चित्र तूं इथें काय म्हणून काढलेंस?" "उगीच. गडे रागावतेस; जसें तूं मदनाचें चित्र काढलेंस तसेंच मीं रतीचें काढलें तर मनाचा भलताच समज करून घेऊन उगाच असें कां बोलतेस? सांग बघूं सगळी हकीगत." मित्रा, काय बरें असावें हें?

राजा—मित्रा, मला तर असें वाटतें, कोणा तरी रमणीनें प्रेमानें आपल्या वल्लभाचें चित्र काढलें, आणि आपल्या मैत्रिणीला तें मदनाचें आहे, असें सांगून खरें लपविण्याचा प्रयत्न केला; पण तिच्या सखीनें चतुरपणानें खरें काय असावें याबद्दल तर्क करून शेजारीं तिचेंच चित्र काढून तें रतीचें आहे असें सांगितलें असावें.

विदूषक—(चुटकी वाजवून) मित्रा, तुझा तर्क बरोबर असावा असें वाटतें.

राजा—अरे बाबा, गप्प रहा ना, ही पहा पुन्हा कांहीं बोलूं लागली. आपण ऐकू या. [दोघे ऐकत उभे राहतात.

विदूषक—अरे, ही पुन्हा म्हणते, " त्यांत ग कसची लाज ! तुझ्यासारख्या कन्यारत्नाचा अशाच वराच्या ठिकाणीं अनुराग जडावयाचा !" मित्रा, तूं आपल्याला कांहीं मोठा पंडित समजूं नकोस. ती काय म्हणतें तें ऐकून सर्व तुला समजावून सांगतों. ज्या मुलीचें चित्र काढलें असेल ती मुलगी मात्र पहाण्यासारखी असली पाहिजे.

राजा—असें जर आहे तर स्वस्थ राहून नीट ऐकूं या. लक्ष घालण्यासारखी ही गोष्ट आहे यांत शंका नाहीं.

[दोघे ऐकत उभे रहातात.]

विदूषक—ऐकलेंस का तूं ही काय म्हणते तें ! "गडे, माझा तर संताप आतां अधिकच वाढूं लागला ! काढून टाक तीं कमळाचीं पानें. त्यांनीं काय होणार ! तूं कशाला स्वतःला त्रास करून घेतेस !"

राजा—मित्रा, नुसतें ऐकलेंच नाहीं तर याचा अर्थसुद्धां माझ्या लक्षांत आला.

विदूषक—अरे मित्रा ! अजून सुद्धां कांहीं पुटपुटते आहे ही बटकीची पोर ! सर्व ऐकून घेऊन मग सांगतों काय म्हणते ती.

राजा—ठीक आहे. [पुन्हा ऐकत रहातात.]

विदूषक—मित्रा ! या बटकीचे पोरीनें चारी वेद मुखोद्गत असलेल्या महाब्राह्मणाप्रमाणें ऋचा म्हणावयास आतां आरंभ केला.

राजा—दुसरीकडे मन गुंतल्यामुळें मीं नाहीं ऐकलें ही काय म्हणाली तें ! सांग पाहूं काय म्हणाली तें.

विदूषक—अरे, ही म्हणते—

अनुराग दुर्लभ जनीं, लज्जा बहु, देह सखि पराधीन।
प्रेम विषम, मरणचि या उपाय गे, अन्य कांहीं न ॥ ६

राजा—(हंसत) खरेंच, तुझ्यासारख्या महाब्राह्मणाशिवाय दुसऱ्या कुणाला असल्या ऋचा माहीत असणार !

विदूषक—तर मग हें काय !

राजा—अरे गाथिका !

विदूषक—काय गाथिका ! पण तिचा अर्थ काय ?

राजा—अरे, कोणा तरी तारुण्यानें मुसमुसलेल्या रमणीनें वल्लभाची प्राप्ति अशक्य आहे असें वाटल्यामुळें जीवाला कंटाळून असें म्हटलें असावें.

विदूषक—(मोठ्यानें हंसून) असें आडून कशाला बोलतोस ? "माझी प्राप्ती अशक्य असें समजून" असें सरळ कां नाहीं सांगत ? कारण तुझ्याशिवाय दुसरा कोण असणार कामदेवाच्या नांवाखालीं लपविण्यासारखा ?

राजा—(वर पाहून) काय मूर्ख आहेस तूं ! तूं मोठ्यानें हंसल्यामुळें घाबरून ती बिचारी सारिका दुसरीकडे कुठें तरी चालती झाली. [दोघेही पहातात.

विदूषक—मित्रा, उगीच कां मला बोलतोस ? ती कदलीगृहाकडेच गेली. चल, आपण तिकडेच जाऊं. [दोघे चालतात.

राजा—

उद्दामे मदनशरें विपन्न बाला ॥
एकांतीं कथि गुज जें सखी-जनांला ।
उद्गारें शुकशिशु-सारिकादिकांचें ।
धन्यांच्या श्रवण-पथांत येत साचें ॥ ७

विदूषक—मित्रा, हें पहा कदलीगृह. चल आंत जाऊं. [आंत शिरतात.

विदूषक—मित्रा, कशाला आतां त्या बटकीचे पोरीला शोधायचे श्रम ! आपण आतां मलयमारुतानें हालत राहिलेल्या कर्दळींच्या छायेमुळें शीतल अशा शिलातलावर बसून कांहीं वेळ विश्रांति घेऊं.

राजा—बरें, तूं म्हणतोस तसें करूं. [दोघे खालीं बसतात.

[राजा निश्वास टाकून 'उद्दामें मदनशरें' वगैरे परत म्हणतो.]

विदूषक—अरे मित्रा ! दुष्ट वानरानें दार उघडून टाकलेला हा सारिकेचा पिंजरा असावा.

राजा—जा, जाऊन पहा बघूं.

विदूषक—जशी आपली आज्ञा. (जाऊन आणि पाहून) अरे, हा तर चित्र-फलक; आधीं हस्तगत करूं या. (घेतो व पाहून आनंद झाल्यासारखें दाखवितो.)

राजा—(कौतुकानें) मित्रा, काय बरें तें ?

विदूषक—मित्रा, मी तुझें अभिनंदन करतों. मीं सांगितल्याप्रमाणें तुझेंच इथें चित्र काढलेलें आहे. दुसरा कोण बरें कामदेवाचें नांव पुढें करून लपवितां येण्यासारखा आहे ?

राजा—(दोन्ही हात पुढें करून) मित्रा, पाहूं पाहूं !

विदूषक—दाखविणार नाहीं. त्या मुलीचें पण इकडे चित्र काढलें आहे. बक्षिसाशिवाय कां असलें कन्यारत्न दृष्टीस पडत असतें ?

राजा—(त्यास कडें देतो व चित्रफलक जबरीनें काढून घेऊन पहातो. पाहून आश्चर्यानें) मित्रा, पहा ! पहा ! !

***लीलावधूतपद्मा दाखवि जी पक्षपात अधिक मला ।**
चित्रीं ही कोण ? गमे हंसी कीं मानसीं शिरे विमला ॥ ८

आणखी

†जेव्हां निर्माण करी धाता हें पूर्णचंद्रसम वदन ।
पद्म-निमीलन होउनि आसन ढळलें नसे, असें वद न ॥ ९

---

* श्लेषोपमालंकार. " मानसीं " या शब्दावर भर आहे. [१] मनांत, [२] मानससरोवरांत; लीलावधूतपद्मा = [१] लीलया अवधूता पद्मा (लक्ष्मी) यया (सौंदर्यांत) लक्ष्मीचा लीलेनें पराभव केला आहे अशी सागरिका. [२] लीलया अवधूतं (चालितम्) पद्मं यया. लीलेनें जी कमळ (कमळें) हालविते अर्थात् हंसी.

पक्षपात = [१] प्रेमातिशय. [२] पक्षैः पातः गमनं. पखांनीं गमन.

† " उत्प्रेक्षालंकार सुंदर साधला आहे. पूर्ण चंद्राप्रमाणें हें वदन निर्माण केल्याबरोबर ब्रह्मदेवाचें आसन जें रक्तकमल तें एकदम संकोच पावल्यामुळें त्याची बसण्याची अडचण झाली.

[सागरिका व सुसंगता प्रवेश करितात.]

सागरिका—गडे सुसंगते, अद्यापि कांहीं ती सारिका आपल्या हातीं लागली नाहीं, तर आपण चित्रफलक तरी या कदलीगृहांतून लवकर घेऊन येऊंया.

सुसंगता—चल, तसंच करूं. (दोघी पुढें होतात.)

विदूषक—मित्रा, ही खालीं मान घातलेली अशी चित्रांत कां बरें काढली आहे ?

सुसंगता—(ऐकून) सखे, वसंतकाचा शब्द ऐकूं येतो त्यावरून वाटतें कीं, महाराज पण इथेंच असावेत. तर आपण या कदलींच्या कुंजांत कांहीं वेळ उभ्या राहून पाहूं काय चाललें आहे तें ! (दोघी उभ्या राहतात व ऐकतात.)

राजा—पहा, पहा. ('जेव्हां निर्माण करी' वगैरे पुन्हा म्हणतो.)

सुसंगता—गडे, खरेंच तूं भाग्यवान् आहेस. पहा, तुझा हृदयवल्लभ कसें तुझें वर्णन करीत आहे.

सागरिका—(लाजून) कशाला गडे तूं या गरीब मैत्रिणीची थट्टा करून तिला लाजवितेस ?

विदूषक—(राजाला हालवून) ऐकलेंस नाहीं का ! मी विचारतों हिचें असें खालीं मान घातलेलें चित्र काढण्याचा काय हेतु असावा ?

राजा—मित्रा, सारिकेनें नाहीं का तें स्पष्टपणें सांगितलें ?

सुसंगता—(हंसून) सारिकेनें आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन केलेंसें वाटतें गडे !

विदूषक—मित्रा, हिच्याकडे पाहून तुला आनंद होतो का ?

सागरिका—(स्वगत) काय बरें याचें उत्तर महाराज देतात ? खरोखर जीवन आणि मरण यांच्या मध्यरेषेवर उभी असल्याचा मला भास होत आहे.

राजा—मित्रा, आनंद होतो म्हणून काय विचारतोस ?

कष्टें सोडुनि ऊरुयुग्म रमली छंदें नितंबस्थलीं ।
मध्यांगीं त्रिवली-तरंगविषमीं ही स्तब्धता पावली ॥
दृष्टी, मोहवशा हटें चढुनियां तुंग स्तनांचे कडे ।
वारंवार इच्या सबाष्प नयनीं प्रेमाकुला ही जडे ॥ १०

सागरिका—(ऐकून आपल्याशीं) मना स्वस्थ हो ! स्वस्थ हो ! धीर धर. तुझा अशा प्रकारचा बहुमान होईल असें स्वप्नांतसुद्धां कधीं वाटलें नव्हतें.

सुसंगता—सखे, ऐकलेंस का तूं ?

सागरिका—(हंसून) तूंच ऐक. तुझ्याच चित्रकलाप्राविण्याची ही प्रशंसा चालली आहे बरें !

विदूषक—अरे मित्रा ! ज्या तुझ्या समागमासाठीं अशी लावण्यसरिता उत्कंठित झाली आहे त्या तुझी स्वतःबद्दल कोण ही अनास्था ! कारण, तूं तर अद्यापपर्यंत स्वतःच्या तसबिरीकडे जरासुद्धां लक्ष दिलें नाहींस.

राजा—(पाहून) हिनें माझें चित्र काढलें हा मी खरोखरच मोठा बहुमान समजतों. तेव्हां लक्ष दिलें नाहीं असें कसें होईल ? पहा, पहा—

मच्चित्रलेखनिं तिच्या नेत्रांतुनि बाष्पसीकर गळाला ।
भासे तो मम देहीं स्वेद तिचा हात लागतां आला ॥ ११

विदूषक—(बाजूस पाहून) मित्रा, अरे ही तर तिची मदनावस्था सुचविणारी कमलांच्या कोमल पानांनीं व तंतूंनीं रचलेली शय्या दिसते.

राजा—खरें आहे तुझें म्हणणें. कारण—

***विरालें दों भागीं स्तनजघन संगें भरयुतें ।**
कटीच्या क्षामत्वें नवहरित मध्यंच दिसतें ॥
भुजांच्या चाळ्यांनीं बघ ! विखरली येथ सरणी ।
कृशांगीचा ताप प्रकट नलिनीपत्र-शयनीं ॥ १२

आणखी—

दल उरिं धरिलें जें पद्मिनीचें विशाल ।
वरि दिसत जयाच्या म्लानसे दोन गोल ॥

---

* स्तन आणि मांड्या फार पुष्ट असून कटिभाग बारीक असल्यामुळें जो कमलशय्येचा भाग वक्षःस्थल आणि जघन यांशीं संलग्न झाला तो शरीरतापामुळें पार कोमेजून गेला आणि क्षीणतेमुळें कटिभाग वरच्यावरच राहिल्यामुळें त्याच्याखालील कमलशय्या हिरवीगार राहिली.

स्तनयुगपरिणाहा जेविं तें दाखवीतें।
स्मरजनित-रुजेची तेंवि ना साक्ष देतें॥ १३

विदूषक—(हातांत कमळाचा तंतु घेऊन) हा पुन्हा दुसरा एक तिच्याच पुष्ट स्तनभागीं ठेवण्यास योग्य असा कोमेजून जात असलेला बिसतंतूंचा हार.

राजा—(घेऊन व स्वतांच्या वक्षःस्थलावर ठेवून) हा मंदबुद्धे!

कुचांत मित्रा च्युत जाहलासी।
म्हणोनि कां तात! सुकोनि जासी॥
राहूं शकेना तव एक धागा।
मिळेल कैसी तुज तेथ जागा?॥ १४

सुसंगता—(स्वगत) अरेरे! हें काय झालें भलतेंच! प्रेमानें मन भडकल्यामुळें महाराजांनीं कांहींतरी असंबद्ध बडबडण्यास सुरवात केली आहे; आतां ह्यापुढें उपेक्षा करणें बरें नाहीं. (उघड) गडे, ज्याच्यासाठीं तूं आलीस तो तर इथें समोरच आहे.

सागरिका—(रागानें) कोणासाठीं मी आलें?

सुसंगता—(हंसून) अग, चित्रफलकासाठीं नाहीं का आलीस? तुझी तरी बाई भलतीच शंका! जा घे पाहूं तो.

सागरिका—(रागानें) बरीच कीं तरबेज आहेस तूं अशा तऱ्हेच्या दुटप्पी बोलण्यांत! मी तर आपली साफ निघूनच जातें.

सुसंगता—राग पण अगदीं नाकावरच बसला आहे जणुं! जरा थांब, मी कंदलीगृहांत जाऊन तो चित्रफलक घेऊन येतें.

सागरिका—जा तर मग!

सुसंगता—बरें; जातें. [सुसंगता कदलीगृहाकडे जातें.

विदूषक—(सुसंगतेला पाहून—घाईनें) मित्रा, ह्या केळीच्या पानानें तो चित्रफलक लवकर झांकून टाक. ती पहा देवीची परिचारिका सुसंगता इकडेच येत आहे. (राजा उत्तरीयानें फलक झांकतो.)

सुसंगता—(पुढें होऊन) महाराजांचा जयजयकार असो!

राजा—सुसंगते, ये बैस इकडे. (सुसंगता बसते.) सुसंगते! मी इकडे आहें हें तुला कसें समजलें?

सुसंगता—(हंसून) महाराज इकडे आहेत एवढेंच नव्हे तर चित्रफलका-संबंधींची सुद्धां सगळी हकीगत मला कळली; आतां जाऊन देवीला कळवितें. (जाऊं लागते.)

वसंतक—(भयानें एकीकडे राजास) मित्रा! खरें असेल कदाचित् हें! ही बटकीची पोर खरोखरच फार बडबडी आहे; तर कांहींतरी बक्षीस देऊन हिचें तोंड बंद कर बघूं.

राजा—योग्य बोललास! (सुसंगतेचा हात धरून) सुसंगते, भलतीच कांहींतरी शंका घेऊं नकोस. नुसती आमची थट्टा चालली होती. ही हकीगत सांगून देवीला कशाला त्रास द्यायचा! हें घे तुला बक्षीस. (कर्णभूषण देण्याची इच्छा दाखवितो.)

सुसंगता—(स्वगत) महाराज खुषींत दिसतात! (उघड) महाराज, आपणांस त्याबद्दल कांहींच शंका नको. मीं महाराजांच्या अनुग्रहाचा जरा फाजील फायदा घेतला इतकेंच! आतां या दासीवर महाराजांनीं एवढीच कृपा करावी कीं, "माझें चित्र तूं काय म्हणून काढलेंस," म्हणून चिडून बसलेल्या माझ्या प्रियसखीची जरा समजूत घालावी.

राजा—(एकदम उठून) सुसंगते, कुठें आहे ती! सांग बघूं!

सुसंगता—ह्या कर्दळीच्या कुंजांत लपून बसली आहे.

राजा—तिकडची वाट दाखिव.

सुसंगता—ह्या मार्गानें यावें महाराज! (असें म्हणून चालूं लागतात.)

विदूषक—मी हा चित्रफलक घेतों. केव्हां तरी उपयोगी पडेल. (चित्रफलक घेतो.) [सर्वजण कदलीगृहांतून बाहेर जातात.

सागरिका—(राजाला पाहून हर्षानें व भीतीनें सकम्प अशी स्वगत) अगबाई! यांना पाहून लज्जेनें एक पाऊलसुद्धां पुढें टाकवत नाहीं! आतां काय करूं?

विदूषक—(सागरिकेला पाहून) अरे वा! अरे वा! काय हें आश्चर्य! अशा प्रकारचें कन्यारत्न या मनुष्यलोकांत तर दुसरीकडे कुठें दिसणें शक्य नाहीं! मला वाटतें हिला घडविल्यानंतर हिच्याकडे पाहून विधात्यालादेखील आश्चर्य वाटलें असेल!

राजा—मित्रा, मला पण असेंच वाटतें.

निजासन-सरोज लाजवि दगंत विस्तारुनी।
निघे 'सरस साधु' चारहि मुखांत ऐसा ध्वनी॥
शिरें डुलवि खास तो विवश होउनी विस्मयें।
सृजोनि ललना विधी भुवन-भूषणा ही स्वयें॥ १५

सागरिका—(सुसंगतेकडे रागानें पाहून) सुसंगते, ह्याच का चित्रफलक तूं आणलास ? (जाऊं लागते.)

राजा—

कोपें वृथा मजकडे बघसी शुभांगे!।
ही स्निग्ध दृष्टि, न इच्यांत कठोरता गे!॥
टाकीं पदें जपुनि मंद, नितंबभारी।
हे, कष्टवी बहु तुझ्या गतिची भरारी॥ १६

सुसंगता—महाराज, हिचा स्वभावच थोडासा रुसवा आहे. हातानें धरून महाराजांनीं हिची समजूत करावी.

राजा—(आनंदानें) बरें, तूं म्हणतेस तसेंच करूं. (सागरिकेचा हात धरून स्पर्शसुख झाल्यासारखें दाखवितो.)

विदूषक—आज तर तूं ही एक अपूर्वच लक्ष्मी संपादन केलीस म्हणायची!

राजा—मित्रा, खरें आहे—

श्री ही, हस्त इचा भासे कल्पवृक्ष-प्ररोहसा।
अन्यथा हा स्वेदमिषें प्रसवे अमृता कसा?॥ १७

सुसंगता—सखे, तूं फारच गडे निष्ठुर आहेस. महाराजांनीं हात धरला तरी सुद्धां तुझा राग जात नाहीं ना ?

सागरिका—(भ्रुकुटी वर चढवून) सुसंगते, अजूनसुद्धां नाहीं का तुझी थट्टा संपत ?

राजा—प्रिये सागरिके! सखीजनांवर अशा प्रकारें फार वेळ रागावणें बरें का?

विदूषक—भुकेलेल्या ब्राह्मणाप्रमाणें तूं कशाला रागावतेस ?

सुसंगता—बरें आहे! मी यापुढें कधीं तुझी थट्टा करणार नाहीं.

राजा—हे मानिनी, जिवलग मैत्रिणीवर असें रागावणें चांगलें नाहीं.



प्रथम भेट.

Lakshmi Art, Bombay, 8

विदूषक—ही तर दुसरी देवी वासवदत्ता. (राजा चकित होऊन सागरिकेचा हात सोडतो.)

सागरिका—सुसंगते ! आतां मी काय करूं ?

सुसंगता—सखे, या तमालवृक्षाच्या आडून आपण निसटून जाऊं.

[दोघी घाईनें जातात.

राजा—(मागें पाहून आश्चर्यानें) कुठें आहे देवी वासवदत्ता ?

विदूषक—मित्रा, हीच ती ! तिच्या रागावण्यामुळें जणुं काय ही दुसरी वासवदत्ता, असें मीं म्हटलें.

राजा—हा मूर्खा !

*दैवेंचि जी मिळाली, राग जिचा स्पष्ट, वाहिली न गळां।
कांता रत्नावलिशी घालविली दोष हा तुझा सगळा॥ १८

[वासवदत्ता व कांचनमाला प्रवेश करितात.]

वासवदत्ता—कांचनमाले, महाराजांची आवडती नवमालिका कितीशी इथून दूर आहे ?

कांचनमाला—ह्या कदलीगृहाच्या पलीकडे आपण गेलों कीं ती दिसेल.

वासवदत्ता—चल, मग वाट दाखिव. आपण तिकडेच जाऊं.

कांचनमाला—चलावें देवींनीं. (दोघी चालूं लागतात.)

राजा—मित्रा, कुठें बरें आतां प्रियतमा दृष्टीस पडेल ?

कांचनमाला—देवि ! जवळच महाराजांचा आवाज ऐकूं येतो, त्यावरून आपलीच महाराज वाट पहात असावेत असें वाटतें. तर देवींनीं पुढें व्हावें.

वासवदत्ता—(पुढें होऊन) आर्यपुत्राचा विजय असो !

विदूषक—(चित्रफलक खाकेंत घालून उत्तरीयानें झांकतो.) ही आली देवी.

राजा—(एकीकडे) मित्रा, झांक तो चित्रफलक. (उघड) ये देवि, बैस इथें.

---

* श्लेषोपमालंकार राग=[१]प्रीति [२] तेज, प्रभा. रत्नावली=[१] नायिका [२] रत्नाची माला.

वासवदत्ता—आर्यपुत्र ! खरंच नवमालिका प्रफुल्लित झाली ?

राजा—(हंसून) देवि, आम्ही इकडे केव्हांच आलों. तुला येण्यास उशीर झाला म्हणून तिला अद्याप पाहिली नाहीं. आतां बरोबरच पाहूंया.

वासवदत्ता—(राजाकडे पाहून) आपल्या मुखानुरागाकडे पाहूनच मीं जाणलें कीं, नवमालिका प्रफुल्लित झाली. चला, तिकडे जाऊं.

विदूषक—देवि, शेवटीं आमच्याच जय झाला. (हात वर करून नाचतो. खाकेंतून चित्रफलक खालीं पडतो, तें पाहून खिन्न होतो. राजा राणीस नकळत फलकाकडे बोट दाखवून वसंतकाच्या तोंडाकडे पाहतो.)

विदूषक—(एकीकडे) मित्रा, उगीच रागावूं नकोस. तूं गप्प रहा. पुढें काय करावयाचें तें सर्व मला माहीत आहे.

कांचनमाला—(चित्रफलक घेऊन) देवि, पहावें हें काय या चित्रफलकावर काढलें आहे तें !

वासवदत्ता—(पाहून—स्वगत) हे आर्यपुत्र आणि त्यांच्या शेजारीं ही सागरिका ! (राजाकडे पाहून उघड) महाराज, हें काय ?

राजा—(गडबडल्यासारखें करून) मित्रा, काय सांगूं आतां ?

वसंतक—(एकीकडे) थांब, तूं नको काळजी करूं. मी देतों याचें उत्तर. (उघड–देवीस) स्वतांचें चित्र काढणें फारच कठीण असं मीं म्हटल्यावरून प्रियमित्रानें हें स्वतःचें कौशल्य दाखविलें आहे.

राजा—वसंतकाचें म्हणणें खरें आहे.

वासवदत्ता—आणि आर्यपुत्र ! ही जी दुसरी आपल्या शेजारीं काढलेली आहे, तें आर्य वसंतकाचें कौशल्य वाटतें ?

राजा—देवी भलतीच शंका घेतेस ! हें कुणातरी मनःकल्पित मुलीचें चित्र आहे, अशी मुलगी आम्हीं कधींच पाहिली नाहीं.

वसंतक—जानव्याची शपथ घेवून सांगतों कीं अशी मुलगी आम्ही केव्हांच पूर्वी पाहिली नाहीं.

कांचनमाला—(एकीकडे देवीस) देवि कदाचित् हें घुणाक्षरन्यायानें पण घडलें असेल. उगीच कशाला रागावतां ?

वासवदत्ता—(एकीकडे कांचनमालेस) अग, तूं आहेस भोळी. तुला

त्यांच्या बोलण्यांतील खोंच काय कळणार ? भग हा वसंतक आहे ! (उघड–राजास) आर्यपुत्र, हें चित्र पाहून माझें डोकें फारच दुखूं लागलें आहे. महाराजांनीं सुखानें बसावें इथें; मीं जातें आतां.

राजा—(पदरास धरून)

*प्रसादा प्रार्थावें, कुपित नससी तूं परि गडे ।
म्हणो 'ऐसें केव्हां न करिन' वृथा डागचि जडे ॥
'नमी दोषी' हेंही वच मुळें न वाटे तुज खरें ।
वदूं कैसें ऐशा समयिं? मजला सांग चतुरे ! ॥ १९

वासवदत्ता—(मर्यादेनें पदर सोडवून) भलतीच कल्पना करूं नये महाराजांनीं. खरेंच माझें डोकें दुखत आहे. बरें, जातें मी. [कांचनमाला व वासवदत्ता जातात.

विदूषक—मित्रा, बरें झालें. नशीब तुझें. अकालीं सुटलेल्या वावटळीप्रमाणें ही वासवदत्ता विशेष त्रास न देतां गेली म्हणायची !

राजा—मूर्ख आहेस अगदीं ! कसला तुला आनंद वाटतो आहे ? जातांना देवीनें आपला राग दाबून टाकल्यामुळें तुझ्या लक्षांत तो आला नाहीं. असें पहा !–

वेगानें भ्रुकुटी चढे, परि करी मुद्रा विनम्रा बळें ।
हास्यें कांपवि चित्त, दुर्वच जरी बोलेचि ना आगळें ॥
विस्तारी प्रभुता-गुणें न नयनें बाष्पाकुलें अंतरीं ।
मर्यादा न ढळोंचि दे प्रियतमा, कोपासि दावी तरी ॥ २०

विदूषक—देवी तर गेलीच ! आतां कशाला तुझें हें अरण्यरोदन !

राजा—चल तर. आपण देवीची समजूत घालण्यासाठीं अंतर्गृहीं जाऊं.

[जातात.

'कदलीगृह' नांवाचा दुसरा अंक समाप्त

*ही वकिली डावपेंचाची भाषा आहे.

*तूं मुळीं रागावलीसच नाहींस, तर मनधरणी करण्याचें कारण काय ? मी असें पुन्हा करणार नाहीं असें म्हणेन तर विनाकारण अपराध अंगीं लागतो. परिस्थिति संशयात्मक असल्यामुळें "माझा मुळींच दोष नाहीं" असें म्हटल्यास तुझा साहजिकच विश्वास बसणार नाहीं. तर या वेळेस कसें भाषण करूं हें तूंच सांग.

अंक तिसरा

[मदनिका प्रवेश करते.]

मदनिका—(वर पाहून) कौशाम्बिके, महाराजांच्या जवळ तुला एवढ्यांत कांचनमाला केव्हां दिसली होती का ? (ऐकून) काय म्हणतेस "किती तरी वेळ तिला इथून जाऊन झाला म्हणून !" कुठें बरें आतां हिला शोधावी ? अरे वा ! ही तर कांचनमाला इकडेच येत आहे. तर आतां जरा पुढें व्हावें.

[कांचनमाला प्रवेश करते.

कांचनमाला—(उपहासानें) शाबास ! वसंतका धन्य आहे तुझी ! अशा तुझ्या कारस्थानापुढें यौगंधरायणांचें राजकारस्थान सुद्धां फिक्कें पडेल खास !

मदनिका—गडे कांचनमाले, काय ग वसंतकानें एवढें केलें कीं तूं त्याची इतकी स्तुति चालविली आहेस.

कांचनमाला—मदनिके, तुला ग या भलत्या उठाठेवी कुणीं सांगितल्या आहेत ? अशा प्रकारचें रहस्य तुझ्या तोंडांत कधींच राहणार नाहीं.

मदनिका—मी देवीच्या पायाचीच शपथ वाहून सांगतें कीं, मी एक शब्द सुद्धां बाहेर फोडणार नाहीं.

कांचनमाला—असें जर आहे तर ऐक, राजमहालांतून परत येतांना चित्र-शाळेच्या दरवाजांत चाललेला वसंतकाचा व सुसंगतेचा संवाद मीं ऐकला.

मदनिका—(जिज्ञासेनें) काय गडे ऐकलेंस ?

कांचनमाला—वसंतक म्हणत होताः "सुसंगते, सागरिकेचा विरह हेंच माझ्या प्रियमित्राच्या अस्वस्थतेचें कारण आहे; दुसरें कांहीं नाहीं. तर याला कांहीं तरी इलाज शोधून काढ."

मदनिका—मग सुसंगता काय म्हणाली ?

कांचनमाला—तिनें उत्तर दिलें, तो चित्रफलकाचा वृत्तान्त घडल्यापासून शंका आल्यामुळें देवीनें सागरिकेवर पहारा ठेवण्यास मलाच सांगितलें आहे. तिनें आपला एक पोषाख मला बक्षीस दिला आहे. तोच पोषाख सागरिकेला

घालून आणि मीं पण कांचनमालेचा वेष घेऊन आज रात्रीच्या पहिल्या प्रहरीं तिला घेऊन महाराजांकडे येतें. तूं एथेंच उभा राहून आमची वाट पहा. नंतर माधवीलतामंडपांत तिची व महाराजांची भेट होईल.

मदनिका—हा दुष्टे कुसंगते! परिजनांवर ममता करणाऱ्या देवीस अशा तऱ्हेनें फसवूं पाहणारी तूं किती तरी कृतघ्न आहेस!

कांचनमाला—पण गडे मदनिके, तूं ग कुठें चालली होतीस?

मदनिका—महाराजांची प्रकृति बरी नाहीं म्हणून त्यांची खबर आणण्यासाठीं तुला पाठविली होती; पण तुला परत येण्यास एवढा उशीर लागल्यामुळें देवीची काळजी अधिकच वाढली म्हणून तिनें तुझ्या शोधासाठीं मला पाठविलें होतें.

कांचनमाला—अगदींच गडे देवी भोळी, म्हणून तिला हीं सर्व ढोंगें खरीं वाटतात. हें पहा प्रकृतीच्या अस्वास्थ्याच्या मिषानें आपली कामावस्था लपवीत असलेले महाराज गच्चीवर बसले आहेत, तर चल आपण घडलेला वृत्तान्त जाऊन देवीला कळवूं. [दोघी जातात.

(प्रवेशक समाप्त.)

[नंतर मदनानें पीडित असा **राजा** बसला आहे असा देखावा.]

राजा—(दुःखानें निश्वास टाकून)

आतां हा स्मरताप सोस हृदया! जों जीव देहीं वसे।
यातें कांहिं नसे उपाय, वरिसी कां तूं वृथा हें पिसें?॥
लाभे जो कर एकदां सुतनुचा प्राक्पुण्ययोगें मला।
मंदें चंदनसेकसा तुजवरी नाहीं तया स्थापिला॥ १

आणि हें तर फारच आश्चर्य!

स्वभावें सूक्ष्म मन हें, तेवि चंचलही असे।
पंचबाणीं मग सर्वें कामें त्या वेधिलें कसें?॥ २

(वर पाहून) देवा कुसुमायुधा !

सारे पांचचि बाण ते स्मरकरीं त्यांहीं असंख्या जना।
मत्तुल्यां करि विद्ध तो जनिं असे कीं रूढ ही कल्पना ॥
आतां ती मज फोल मन्मथ ! गमे, जाणें असंख्यां शरां।
जेव्हां सोडिसि तात ! कामिजन तो पंचत्व* पावे खरा॥ ३

(विचार करून) पण माझी अशा प्रकारची कष्टप्रद अवस्था झाली तरी मला स्वतःबद्दल कांहीं काळजी वाटत नाहीं; पण हा सर्व प्रकार रागीट व मानिनी अशा देवीच्या लक्षांत आल्यामुळें त्या बिचाऱ्या सागरिकेची अवस्था मात्र मला कठिण दिसते. कारण—

रहस्यातें जाणे जन समजुनी तोंड लपवी।
कुणाही दोघांचें गुज निजकथा तीस सुचवी॥
स्मितें होई लज्जा-विकल सखियांच्या सुवदना।
प्रियेच्या वाटे ही बिकट जडली व्याधिच मना॥ ४

मीं वसंतकाला तिची बातमी काढण्यासाठीं केव्हांचा पाठविला आहे ! कां बरें त्याला परत यावयाला असा उशीर व्हावा ?

[आनंदित झालेला वसंतक प्रवेश करतो.]

वसंतक—(आनंदानें) हः, हः, हः ! काय मजा आहे पहा ! कौशाम्बीचें राज्य मिळाल्यामुळेंसुद्धां प्रिय मित्राला जेवढा आनंद झाला नाहीं तेवढा आतां मी सांगणार ती आनंदाची बातमी ऐकून होईल यांत शंका नाहीं. तर आतां जाऊन त्याला ही बातमी सांगतों. (चालून व पाहून) अरे, हा पहा प्रिय मित्र ! ज्याअर्थीं हा इकडेच पहात आहे त्याअर्थीं हा माझीच वाट पहात असावा. तर आतां पुढें जातों. (समोर जाऊन) प्रिय मित्राचा विजय असो ! मित्रा, तुझें कार्य सफल झाल्याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों.

राजा—(हर्षानें) मित्रा, सागरिका कुशल आहे ना ?

वसंतक—(गर्वानें) थोड्याच वेळानें तूं तिला स्वतःच पाहिल्यावर समजेल.

राजा—(आनंदानें) काय ? दर्शनदेखील होईल म्हणतोस प्रियेचें ?

* 'पंच' आणि 'पंचत्व' या शब्दावर ही कोटी आहे पंचत्वंगम्=मरणें.

वसंतक—(गर्वानें) बृहस्पतीचें बुद्धिवैभवसुद्धां ज्याच्या पुढें तुच्छ आहे असा हा विद्वान् ब्राह्मण तुला अमात्य मिळाल्यानंतर काय होणार नाहीं ?

राजा—(हंसून) यांत काय संशय ? तूं काय करणार नाहींस ? बरें तर सांग बघूं सर्व हकीकत ?

[विदूषक कानांत असं असं म्हणून सांगतो.]

राजा—(आनंदानें) मित्रा ! हें घे तुला बक्षीस. (हातांतलें कडें काढून देतो.)

वसंतक—बरें, तें असो. मी अगोदर घरीं जाऊन माझ्या हातांतील शुद्ध सोन्याचें हें कडें आमच्या भटणीस दाखवितों.

राजा—(हात धरून त्यास अडवून) मित्रा, तें मग दाखव ! आतां दिवस कितीसा उरला आहे पहा बघूं.

वसंतक—(इकडे तिकडे पाहून–आनंदानें) मित्रा, पहा तर खरें ! हा पहा, भगवान् सहस्ररश्मिसुद्धां दृढानुरागानें आकृष्टचित्त असा पश्चिम दिग्वधूला संकेतस्थलीं भेटण्यासाठीं अस्तागिरीच्या शिखरावर असलेल्या उपवनाकडे कसा झपाट्यानें धांव घेत आहे.

राजा—(पाहून–आनंदानें) मित्रा, बरोबर आहे तुझें म्हणणें. खरेंच, संध्यासमय तर झालाच. कारण—

***आलों आतांचि कष्टें क्रमुनि दिनभरीं विश्वमार्गा विशाला।**
एका चक्रें रथाच्या पुनरपि न शकें लंघण्या मी तयाला॥
ऐशा भावें दुजें घे रवि गमतचि दिक्चक्र हें सोनियांचें।
संध्यालुप्तावशेषा किरणतति गमे स्पष्टसे आर याचे॥ ५

*सूर्यास्ताच्या वेळीं क्षितिजाच्या कडेवर सूर्यकिरण चारी बाजूंस फांकल्यामुळें गाडीच्या चाकासारखा जो देखावा दिसतो त्याचें हें उत्प्रेक्षारूपानें वर्णन आहे.

संध्यालुप्तावशेषा–अस्तसमयीं (संध्याकाळीं) सूर्य हतप्रभ झाल्यामुळें जे थोडे शिल्लक राहातात व ज्यांची शोभा चाकाच्या दांड्याप्रमाणें दिसते अशा किरणांनीं बनविलेलें दिक्चक्र (पश्चिम दिशेचें चाक) घेऊन सूर्य अस्तागिरीवर उभा आहे. श्लोकांची रचना कांहींशी क्लिष्ट असल्यामुळें अर्थबोध सहज होत नाहीं.

तसेंच—

* जातोंचि, पद्मवदने, मम वेळ झाली।
घे झोंप, मीच उठवीन तुला सकाळीं॥
आश्वासवी रवि अशापरि पद्मिनीला।
हा अस्तमस्तकिं निवेशुनियां करांला॥ ६

चल उठ. आपण माधवीलतेच्याच मंडपांत जाऊन प्रियतमेला भेटण्याच्या वेळेची वाट पहात बसूं.

वसंतक—ठीक आहे! हा पहा, विरल वनराजीस घनदाट भासविणारा व दाट चिखलांत लोळलेल्या पुष्ट वराहाप्रमाणें किंवा रेड्याप्रमाणें कृष्णकांति धारण करणारा असा अंधार किती जोरानें पूर्व दिशा आक्रमीत आहे.

राजा—(चोहोंकडे पाहून—आनंदानें) योग्य बोललास. कारण—

† खची प्राची आधीं, मग इतर दिग्भाग सगळे।
क्रमें झांकी आंगें वनतरु-पुरांचीं निजबळें॥
दुणावोनी काळें विफल जननेत्रां तम करी।
हराच्या कण्ठाची द्युति निबिडनीला अनुकरी॥ ७

चल तर, मार्ग दाखव बघूं.

वसंतक—चल मित्रा! (दोघेही चालतात.)

वसंतक—(पाहून) झाडांच्या दाटीमुळें मकरंदोद्यानांत तर जिकडे तिकडे घनदाट काळोख झाला. आतां मार्ग कसा समजणार!

राजा—(वास घेऊन) मित्रा, हो पुढें! इथें मार्ग शोधून काढणें कांहीं कठीण नाहीं. कारण पहा—

---

* या श्लोकांत "अस्तमस्तक" हा श्लेष विशेष महत्त्वाचा आहे.

अस्तमस्तकनिविष्टकर=[१] सूर्यपक्षीं, अस्तगिरीच्या शिखरावर ज्याचे किरण पसरले आहेत असा. [२] वल्लभपक्षीं, अस्त=नम्र. शोकनम्र झालेल्या मस्तकावर हात ठेविलेला. पद्मवदना या शब्दांवर ही श्लेष आहे; पद्म हेंच जिचें वदन आहे अशी **कमलिनी** पद्माप्रमाणें जिचें वदन आहे अशी **विरहिणी युवती.**

†संध्याकाळचें याहीपेक्षां सुंदर वर्णन मालतीमाधवांत आहे [अंक ५ श्लोक ६ पहा]
व्योम्नः तापिच्छगुच्छावलिभिरिव तमोवल्लरीभिर्व्रियंते। इत्यादि

श्रेणी ही चंपकांची, नयनसुभग हा निर्गुंडीवृक्ष साचा।
राई ही दाट येथें बकुलविरचिता, संघ हा पाटलांचा॥
नानागन्धांनुसारें चिरपरिचित हे वृक्ष येती कळोनी।
अंधारींही अशा या, सहजचि उमगे वाट मातें खुणांनीं॥८

[दोघे चालतात.

वसंतक—मित्रा, रसलोलुप भुंग्यांच्या उड्या पडत आहेत अशा ह्या बकुल पुष्पांच्या वासानें ज्याच्या चारी बाजू सुगंधित झाल्या आहेत, व कोमल मरकत-मणि बसवल्यामुळें ज्याची वेदी पायांस सुख देत आहे अशा ह्या माधवीलता-मंडपांत आपण पोहोचलोंच. तर आता इथेंच थांब मी जाऊन देवीचा वेष धारण केलेल्या सागरिकेला लवकर घेऊन येतों.

राजा—मित्रा, लवकर जा.

वसंतक—मित्रा, असा उत्कंठित होऊं नकोस. हा आलोंच. [जातो.

राजा—आपण आतां या मरकतमण्यांनीं बांधलेल्या आसनावर बसून प्रियेची वाट पहावी. (बसून–विचार करीत) स्वस्त्रीचा समागम सोडून नव्या तरुणीच्या प्राप्तीचा अभिलाष करण्याची कामी जनांची प्रवृत्ति विचित्र तर खरीच ! कारण—

* नयन नयना भेटों ना दे मनीं भय वागवी।
स्तन भिडवुनी गाढाश्लेषें प्रिया नच तोषवी॥
जरि अडविली यत्नें 'जातें' वदेचि अनेकदा।
अधिक परि दे या चेष्टांनीं नवा प्रमदा मुदा ९

वसंतकाला एवढा उशीर लागण्याचें कारण काय बरें असावें ? देवी वासवदत्तेला तर हा वृत्तान्त कळला नसेल ना ?

---

* मूळ श्लोकांत "संकेतस्था" या शब्दप्रयोगानें कवितेचें स्वारस्य निःसंदेह कमी होतें. कारण एखाद्या स्त्रीबरोबर संकेत अनेक वेळांही होणें शक्य आहे. पण प्रथम-समागमानंतर इतर संकेतसमयीं युवतीची मनःस्थिति श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें असणें शक्य नाहीं. श्लोकापूर्वीच्या गद्य भागांतला "अभिनवजन" हा प्रयोगच ठीक दिसतो व त्यास अनुसरूनच भाषांतर केलें आहे. पहिल्या दोन ओळींचें भाषांतर असेंही करतां येईल.

लपवि नयनें प्रेमार्द्रेंही वृथा मनिं शंकिता।
स्तन भिडवुनी घेई प्रेमें मिठी न गळां स्वतां।

नागानंद नाटकांत हीच कल्पना बहुतेक सारख्याच शब्दांत वर्णिलेली आहे.

[वासवदत्ता व कांचनमाला प्रवेश करतात.]

वासवदत्ता—कांचनमाले, माझा पोषाक घालून आर्यपुत्रांना प्रेमभेट देण्यासाठीं जाण्याचें खरेंच का सागरिका धारिष्ट करणार आहे ?

कांचनमाला—मग मी काय देवीला खोटेंच सांगेन ! लांब कशाला ! चित्रशाळेच्या द्वारावर उभ्या असलेल्या वसंतकाला पाहून देवीची खात्री होईल.

वासवदत्ता—चल तर, तिकडेच जाऊं.

कांचनमाला—यावें देवी ! (दोघी चालतात.)

[सर्वांग वस्त्रानें झांकून बसलेला वसंतक दिसतो.]

वसंतक—(कान देऊन) चित्रशाळेच्या द्वारावर पावलें वाजलेलीं ऐकूं येत आहेत, त्यावरून सागरिका आलीसें वाटतें.

कांचनमाला—ही आलीच चित्रशाळा. आतां मी वसंतकाला खुणा करतें. (चुटकी वाजविते.)

वसंतक—(आनंदानें पुढें होऊन) सुसंगते, तुझा कांचनमालेचा वेष तर अगदीं बरोबर साधला आहे. पण सागरिका कुठें आहे ?

कांचनमाला—(बोटानें दाखवून) ही काय !

वसंतक—(पाहून आश्चर्यानें) ही खास वासवदत्ता !

वासवदत्ता—ओळखलें वाटतें मला यानें ! मग मी इथून जातेंच. (जाऊं लागते.

वसंतक—अग सागरिके, इकडे ये.

कांचनमाला—(एकीकडे) अरे कपाळकरंट्या, ह्याचा तुला पुढें पश्चात्ताप होईल बरें. (वासवदत्ता हंसून कांचनमालेकडे पहाते.)

वसंतक—सागरिके, चल लवकर. हा पहा पूर्वभागीं भगवान् चंद्रमा उगवलाच.

दृष्टादृष्टिमधो ददाति कुरुते नालापमालापिता । इत्यादि

....

....

जाना वामतयैवाद्य सुतरां प्रित्यै नवोढा प्रिया । [अंक ३ श्लोक ४]

—नागानंदना.

वासवदत्ता—(घाईनें–एकीकडे) देवा शीतरश्मे ! तुला नमस्कार करितें. आणखी एक घटकाभर उदय न पावण्याची कृपा कर. तोंपर्यंत मी यांची ही प्रेमलीला पाहून घेतें. (सर्व चालतात.)

राजा—(उत्कंठेनें स्वतांशींच) प्रियेच्या समागमाची वेळ जवळ आली असून मनाची अशी चमत्कारिक अवस्था कां बरें होते? अथवा—

स्मरताप कष्ट अधिकचि देतो जों संधिकाल ये जवळ।
ग्रीष्मीं दाह असह्यचि होतां समजें पडेल शीघ्र जळ १०

वसंतक—(ऐकून) हा पहा तुझीच वाट पहात असलेला माझ्या प्रिय मित्र अत्युत्कंठेमुळें तुलाच उद्देशून कांहीं बोलतो आहे. तर थांब, तूं जरा इथेंच उभी रहा. मी जाऊन त्याला तूं आल्याची वर्दी देतों.

[वासवदत्ता मान हालविते.]

वसंतक—(राजाकडे जाऊन) मित्रा ! तूं दैववान् आहेस. मी सागरिकेला घेऊन आलों.

राजा—(आनंदानें उठून) खरेंच ? कुठें आहे ती ?

वसंतक—(डोळे मुरडून) ही काय !

राजा—(पुढें सरून) प्रिये सागरिके !—

चंद्राची सुषमा मुखासि, नयना नीलोत्पलांची सरी।
पद्माचे सम हस्त, ऊरु कदली, बाहू मृणालापरी॥
आंगें सर्व तुझीं सुधेसम सखे ! सोडोनि शंका मला।
गाढालिंगन दे झणीं ! सुखवि या दीना स्मरव्याकुला ११

वासवदत्ता—(एकीकडे) कांचनमाले, हें आर्यपुत्रांचें भाषण नीट ऐकून ठेव आणि हीच स्वारी मला ओळखल्यावर कशा तऱ्हेनें बोलूं लागेल तें पहा !

कांचनमाला—देवी, खरेंच तें ! परंतु साहसी पुरुष काय करतील आणि काय नाहीं !

वसंतक—सागरिके ! आतां स्वस्थपणानें प्रिय मित्राबरोबर संभाषण कर. नेहमींच रागांत असलेल्या वासवदत्तेच्या कठोर भाषणामुळें पीडित झालेल्या त्याच्या कानाला तुझ्या तोंडचे चार गोड शब्द ऐकून सुखी होऊं दे.

वासवदत्ता—(एकीकडे–रागानें पण किंचित् हंसून) कांचनमाले, मी कठोर भाषण करणारी बरं का! आणि आर्य वसंतक काय तो गोड बोलणारा; बरं आहे!

कांचनमाला—(बोटें मोडून एकीकडे) अरे कपाळकरंट्या, ह्याचा तुला पुढें पश्चात्ताप होईल बरें.

वसंतक—मित्रा, पहा पहा! रागावलेल्या तरुण युवतीच्या कपोलाप्रमाणें तांबुस असा पूर्वदिशा प्रकाशमान करणारा भगवान् मृगलांछन उगवला.

राजा—(पाहून) प्रिये सागरिके, पहा पहा!—

हरिली द्युति सकल तुझ्या वदनें याची म्हणोनी हा कांते।
प्रतिकारोद्यत चढला शैलशिरीं विधु उभारुनि करांतें १२

यानें या वेळीं उगवून आपल्या मंदबुद्धीचेंच नाहींका प्रदर्शन केलं? कारण—

पद्माची द्युति काय हा न हरितो? देतो न नेत्रोत्सवा?।
कीं कामोद्भव दर्शनेंचि मनुजा याच्या न होई नवा? ॥
ऐसा त्वद्वदनेंदु एक असतां, कां चंद्र येथें दिसे?।
वाहे गर्व असे सुधा म्हणुनि? या बिंबाधरीं ती वसे १३

वासवदत्ता—(रागानें अवगुंठन काढून) आर्यपुत्रा! मी सागरिकाच नाहीं का? आपल्याला सागरिकेचा ध्यास लागल्यामुळें चारी दिशांना सागरिकाच दिसते.

राजा—(आश्चर्यचकित) आतां मात्र कठिण अवस्था! ही तर वासवदत्ता! मित्रा, हें काय?

वसंतक—(खिन्न मुद्रेनें एकीकडे) अरे मित्रा, दुसरें काय? आतां आमची जगण्याची आशा थोडीच.

राजा—(खालीं बसून व हात जोडून) प्रिये वासवदत्ते, दया कर, दया कर.

वासवदत्ता—(रडत) आर्यपुत्र! आतां त्या दुसरीला दिलेल्या 'प्रिये' ह्या शब्दानें पुन्हा मला संबोधूं नका.

वसंतक—(स्वगत) आतां काय करावें बरें? हरकत नाहीं, असें करूं. (उघड) देवि, तुझें मन फार थोर आहे. तर दया करून प्रिय मित्राच्या एवढ्या अपराधाची क्षमा कर.

वासवदत्ता—आर्य वसंतक ! वास्तविक पाहतां पहिल्याच भेटीच्या वेळीं येऊन मीं विघ्न केलें हा माझाच अपराध.

राजा—हें सर्व तुझ्या दृष्टीस पडल्यानंतर मी आतां कुठच्या तोंडानें बोलूं. तथापि एवढेंच म्हणतों—

* लाली तुझ्या सखि ! अलक्तकजा पदांची।
हा मी विवर्ण हरितों स्वशिरें अतांची।
कोपोपरागज दुजी सदये ! जना या।
देशील काय मुखचंद्रमिंची हराया ? ॥

[पायांवर डोकें ठेवतो.

वासवदत्ता—(हातानें निवारण करून) आर्यपुत्र, उठा, उठा ! आपल्या मनाची एकदां परीक्षा झाल्यानंतर पुन्हा मीं रागावणं म्हणजे निर्लज्जपणाची कमालच ! बसावें महाराजांनीं सुखानें. मी जातें. (जाऊं लागते.)

कांचनमाला—राणीसाहेब, करावा महाराजांवर अनुग्रह. पायांवर डोकें टेंकलेल्या महाराजांना टाकून गेल्याचा मागाहून आपल्याला पश्चात्ताप होईल.

वासवदत्ता—तूं मूर्ख आहेस. अनुरागाचें अगर पश्चात्तापाचें इथं काय कारण ? चल जाऊं. [दोघी जातात.

राजा—देवि, कृपा कर ! कृपा कर ! ('लाली तुझ्या' वगैरे म्हणतो.)

वसंतक—अरे, ऊठ. देवी वासवदत्ता गेली. आतां कशाला हें अरण्यरुदन ?

राजा—(डोकें वर करून) काय ? अनुग्रह केल्याशिवाय देवी गेली ?

वसंतक—आपण इथें अजूनपर्यंत सुरक्षित आहोंत हाच केवढा अनुग्रह !

---

*या श्लोकांत 'विवर्ण' हा शब्द द्व्यर्थी आहे [१] नीच, पतित व [२] लज्जेनें पांढरा फटफटीत झालेला; विवर्ण (वर्णरहित) झाल्यामुळें राजा वासवदत्तेच्या पावलांवरील अळित्याचा लाल रंग काढून घेण्याचा यत्न करीत आहे असाही एक ध्वनि निघतो. पावलाची लाली त्यांवर मस्तक घासून हरण करणें शक्य आहे; पण कोपोपरागामुळें (उपराग-ग्रहण) उत्पन्न झालेली मुखचंद्राची लाली हरण करण्याचा एकच उपाय (चुंबन) त्या वेळच्या परिस्थितींत शक्य नाहीं, पण राजाची रंगेल वृत्ति व धीट स्वभाव लक्षांत घेतां अशा बिकट परिस्थितींतही त्यानें चुंबनाची " सुकुमार प्रार्थना " करणें असंभाव्य दिसत नाहीं.

राजा—मूर्खा, धिक्कार असो तुला! पहिल्यापासून या सर्व अनर्थपरंपरेचें मूळ तूंच असून वर आणखी माझाच उपहास चालवला आहेस ? कारण—

न या प्रेमा सीमा निकटसहवासें अनुदिनीं।
प्रिया पाहे कष्टें अविनय नवा हा स्वनयनीं॥
गमे मातें कोपें असु असहना त्यागिल खरी।
जिव्हाळ्याच्या प्रेमा विघड नच सोसे क्षणभरी॥ १५

वसंतक—अरे, पण देवी तर फारच रागावली आहे. काय करील तें कांहीं समजत नाहीं. सागरिकेची अवस्था मात्र आतां कठीण, एवढें खरें.

राजा—मित्रा! मीं पण त्याचाच विचार करतों आहें. हा प्रिये सागरिके!

[वासवदत्तेचा वेष धारण केलेली सागरिका प्रवेश करते.]

सागरिका—(उद्वेगानें) देवीचा वेष धारण करून संगीत शाळेंतून बाहेर पडतांना कुणाच्या दृष्टीस पडलें नाहीं हें मोठें नशिबच! पण आतां पुढें काय करूं?

वसंतक—मित्रा! अजागळासारखें स्वस्थ बसून काय होणार ? आतां घडलेल्या गोष्टींना कांहीं इलाज शोधून काढ.


राजा—मी पण त्याचाच विचार करतों आहें. देवीच्या अनुग्रहाशिवाय दुसरा कांहीं उपाय दिसत नाहीं. चल तर, तिकडेच जाऊं. [दोघे चालतात.

सागरिका—(ऐकलेंसें करून) देवीला ही सर्व हकीगत समजलीशी दिसते. आतां स्वतांस टांगून घेऊन आत्महत्त्या करतें म्हणजे सुसंगतेप्रमाणें माझीही होणारी मानखंडनेची विटंबना तरी चुकेल. (विचार करून) तर आतां या अशोक वृक्षाकडे जाऊन ठरल्याप्रमाणें करावें. (चालते.)

वसंतक—(ऐकून) मित्रा, जरा थांब. पावलांचा आवाज तर ऐकूं येत आहे. आपल्या कठोरपणाचा पश्चात्ताप झाल्यामुळें देवी तर परत येत नसेल ना?

राजा—मित्रा! देवीचें मन खरोखरच फार मोठें आहे. त्यामुळें तूं म्हणतोस तसें पण असण्याचा संभव आहे खरा. पुढें होऊन पहा तर खरा काय प्रकार आहे तो!

सागरिका—(पुढें होऊन) आतां ह्या माधवीलतेचा पाश करून ह्या अशोक वृक्षाला स्वतांला टांगून घेऊन मी आत्महत्त्या करतें. आई! बाबा! कुणाचाच आतां आधार न राहिल्यामुळें अनाथ झालेली मी आतां हें जग सोडून चाललें. (लतापाश गळ्यांत घालते.)



सागरिका सांत्वन.

Lakshmi Art, Bombay, 8

वसंतक—ही कोण ? काय ? देवी वासवदत्ता ! (भीतीनें-मोठ्यानें) मित्रा, धांव, धांव ! ही पहा वासवदत्ता गळ्याला फांस लावून जीव देत आहे !

राजा—(गळ्यांतले पाश काढीत) अग साहसिनी ! हें महत्पाप तूं काय म्हणून करतेस ?

कंठीं आले प्राण माझे त्वत्कंठा पाश लागतां।
स्वार्थीच यत्न हा माझा ! सोडिं या साहसा आतां १६

सागरिका—(राजाला पाहून) काय महाराज ! (आनंदानें-स्वगत) यांना पाहून मला पुन्हा जगावें असें वाटूं लागलं. अथवा यांना पाहण्याची माझी इच्छा परिपूर्ण झाली म्हणजे कृतार्थ होऊन फांस लावून घेईन आणि सुखानं मरेन. (उघड) महाराज, सोडावी मला. परस्वाधीन माझें सगळें जीवित; तेव्हां मरायालासुद्धां अशा प्रकारची सुरेख संधी पुन्हा मिळेल कीं नाहीं कुणास ठाऊक ! शिवाय आपणही देवीच्या रोषांतून मुक्त व्हावं. (पुन्हा गळ्यांत पाश घालूं लागते.)

राजा—(पाहून आनंदानें) काय माझी प्रिया सागरिका ! (गळ्यांतले पाश काढून टाकून)—

न करिं न करिं कांते ! घोर या आत्मघाता।
झडकरि करिंचा दे टाकुनी पाश आतां।
त्यजुनि मम शरीरा प्राण जाया निघाले।
अडिव ! अडिव ! यांना बाहुपाशें दयाळे ! ॥ १७

(तिचे हात सोडवून ते आपल्या गळ्यांत घालून स्पर्शसुख झाल्यासारखें दाखवितो.) मित्रा ! ही तर मेघगर्जनेशिवायच वृष्टि !

वसंतक—खरेंच ! आकस्मिक वावटळीप्रमाणें देवी आली नाहीं म्हणजे मिळविलें.

[वासवदत्ता व कांचनमाला प्रवेश करितात.]

वासवदत्ता—कांचनमाले, तशा तऱ्हेनं पायावर डोकें ठेवलेल्या आर्यपुत्रांना झिडकारून निघून आलें हें फारच निर्घृण कृत्य केलें असें आतां मला वाटूं लागलं आहे. मीं आतां स्वतांच जाऊन आर्यपुत्रांची क्षमा मागतें.

कांचनमाला—देवीशिवाय दुसऱ्या कुणाच्या तोंडांतून अशा प्रकारचे उद्गार निघतील ! महाराजानींच करूं द्या वाटेल तें निर्घृण कृत्य ! देवींनीं मात्र तसें केलें नाहीं म्हणजे झालं. चला तर देवी ! जाऊं या. (दोघी जातात.)

राजा—अग वेडे, अजून देखील कां बरें परकेपणानें वागतेस ? माझे मनोरथ कां बरें पुरवीत नाहींस ?

कांचनमाला—(कान देऊन) देवी ! जवळच महाराजांचा शब्द ऐकूं येतो आहे. त्यावरून महाराज आपल्याला समजावण्यासाठींच येत आहेत असें वाटतें ! तर व्हावें देवींनीं पुढें.

वासवदत्ता—तर मग मी न कळत मागाहून गळ्यांत हात घालून आर्य पुत्रांना संतोषित करितें.

वसंतक—अग सागरिके ! आतां अगदीं निःशंकपणें प्रिय मित्राबरोबर भाषण कर.

वासवदत्ता—(खेदानें) कांचनमाले, सागरिका पण इथें आहे. तर अगोदर इथूनच ऐकूंया. मग मी पुढें होईन.

सागरिका—महाराज, कशाला हें खोटें प्रेम-प्रदर्शन ! प्राणाहूनसुद्धां प्रिय असलेल्या देवीला या कृत्यानें राग नाहीं का येणार ?

राजा—तुझें म्हणणें अगदीं खोटें आहे. पहा—

श्वासानें उर कांपलें लव जरी, ये कंप माझ्या मना।
बोलेना तरि आर्जवीं मधुवचें नाना परी कोपना॥
भ्रूभंगें चरणीं जडें झडकरी, सेवाचि ही आचरीं।
देवीची, अभिजात मी म्हणुनि गे, मद्वल्लभा तूं खरी १८


वासवदत्ता—(पुढें होऊन–रागानें) योग्य ! योग्य ! आर्यपुत्रा, अगदीं योग्य !

राजा—(पाहून–दुःखानें) देवी ! विनाकारण तूं माझ्यावर रागावते आहेस ! वेषाच्या सादृश्यामुळें तूंच असें समजून आम्ही इकडे आलों. तर क्षमा कर. (पायांवर डोकें टेकतो.)

वासवदत्ता—(रागानें) महाराज, आपल्या अभिजात दाक्षिण्यामुळें कशाला आपण त्रास करून घेतां ? उठा आतां.

राजा—(स्वगत) काय ! हें पण ऐकलें देवीनें ! आतां तर देवीची समजूत करण्याचा कांहींच उपाय दिसत नाहीं.

वसंतक—देवी ! वेषसादृश्यामुळें तूंच आत्महत्त्या करते आहेस असें मला



राणी-आज्ञा.

Laxmi Art, Bombay, 8.

वाटलें म्हणून मींच प्रियमित्राला इकडे बोलवून आणला. माझें बोलणें जर खोटें वाटत असलें तर हा प्रत्यक्ष लतापाशच पहा.

वासवदत्ता—कांचनमाले, ह्याच लतापाशानें बांधून ह्या ब्राह्मणाला घे बघूं बरोबर. या दुष्ट पोरीला पण पुढें चालव.

कांचनमाला—जशी देवीची आज्ञा (लतापाशानें वसंकाला बांधून मारते.) मूर्खा ! स्वतःच्या दुष्ट कृत्यांचीं फळें आतां भोग. 'देवीच्या कठोर वचनांनीं कान किटले' या तुझ्या शब्दांची आठवण कर. सागरिके, तूं पण पुढें हो.

सागरिका (स्वगत) मीं मागच्या जन्मीं सुखानें मरण्याइतकें देखील पुण्य नव्हतें ना केलें ?

वसंतक—(दुःखानें) मित्रा ! देवीच्या हातून मला अनाथाला सोडविण्याची खटपट कर.

[वासवदत्ता राजाकडे पहात वसंतकाला व सागरिकेला घेऊन कांचनमालेसह जाते.]

राजा—(दुःखानें) हाय ! हाय !—

देवीच्या मुखपंकजीं स्मित-सुधा कोपें कशी आटली ।
झाल्या सागरिकेसि रोष-परुषा निर्भर्त्सना लाधली ॥
नेला बांधुनिया वसंतक-कसा, या चिंतनीं सर्वदा ।
सर्वांशीं खचलों मनीं, क्षणभरीं शांती न लाभे कदा १२

आतां इथें उभें राहून काय होणार ! देवीची समजूत घालण्यासाठीं आंतच जावें. [जातो.

'संकेतक' नांवाचा तिसरा अंक समाप्त

अंक चवथा

[रत्नमाला हातांत घेऊन अश्रु गाळीत सुसंगता प्रवेश करते.]

सुसंगता—(दुःखानें निश्वास टाकून) हा प्रिय सखि सागरिके! हा लज्जावति! हा सखिजनवत्सले! हा उदारशीले! हा सौम्यदर्शने! कुठें आहेस तूं? मला उत्तर दे! (रडते—वर पाहून निःश्वास टाकून) हा निष्ठुर दैवा! अशा प्रकारचें अलौकिक रूप देऊन नंतर तिची अशी दुर्दशा तूं कां बरें केलीस! जीविताबद्दल निराश झाल्यावर तिनें ही रत्नमाला माझ्याकडे देऊन कुणातरी सत्पात्र ब्राह्मणाला देण्याविषयीं मला सांगितलें आहे. तर आतां कुणीतरी ब्राह्मण मी शोधून काढतें. (पडद्याकडे पाहून) अरे वा! हा वसंतक ब्राह्मण इकडे येत आहे यालाच देऊन टाकतें.

[आनंदित झालेला वसंतक प्रवेश करतो.]

वसंतक—वाहवा रे वाहवा! काय मजा झाली! काय मजा झाली! प्रिय मित्रानें मोठ्या कष्टानें एकदांची समजावल्यानंतर प्रसन्न होऊन देवीनें आज माझी बंदींतून मुक्तता केली व मला आपल्या हातानें यथेच्छ पोटभर मोदक व लाडू वाढले; एवढेंच नव्हे तर हीं वस्त्रें आणि हें कर्णाभरण पण दिलें. तर आतां अगोदर जाऊन प्रियमित्राला भेटतों. (चालूं लागतो.)

सुसंगता—(रडत—एकदम पुढें होऊन) आर्य वसंतक, जरा थांबा!

वसंतक—(पाहून) कोण सुसंगता? सुसंगते, तूं कां रडतेस? सागरिकेचें कांहीं बरेंवाईट तर झालें नाहीं ना?

सुसंगता—तेंच तर आतां मी सांगणार आहें. उज्जयिनीला पाठविलें अशी बातमी उठवून देवीनें तिला मध्यरात्रीं कुठें पाठविली कांहीं कळत नाहीं.

वसंतक—(दुःखानें) हा सागरिके! हा असामान्यरूपधारिणि! हा मंजुभाषिणि! देवीनें खरोखरच हें अतिकठोर कृत्य केलें. बरें, पुढें?

सुसंगता—जगण्याविषयीं अगदीं निराश झाल्यावर तिनें ही रत्नमाला माझ्याकडे देऊन आर्य वसंतकाला दे, म्हणून मला सांगितलें.

वसंतक—(डोळ्यांत पाणी आणून, कानांवर हात ठेवून, दुःखानें) सुसंगते, अशा स्थितींत ही रत्नमाला घ्यायला माझा हातच पुढें होत नाहीं.(दोघे रडतात.)

सुसंगता—(हात जोडून) तिच्यावर कृपा करून आपण हिचा स्वीकार करावा.

वसंतक—(विचार करून) बरें, आण ती इकडे ! सागरिकेच्या विरहामुळें कुण्ठितमती झालेल्या प्रियमित्राचें तरी मला हिच्यामुळें थोडें सांत्वन करतां येईल. (सुसंगता वसंतकाच्या हातांत रत्नमाला देते.)

वसंतक—(घेऊन व निरखून पाहून आश्चर्यानें) हिच्याकडे एवढा मौल्यवान् अलंकार कसा बरें आला ?

सुसंगता—आर्या ! मला पण याचेंच आश्चर्य वाटल्यामुळें मीं तिला एकदां याबद्दल प्रश्न विचारला होता.

वसंतक—मग तिनें काय उत्तर दिलें ?

सुसंगता—तिनें वर पाहून एक दीर्घ निःश्वास टाकला आणि ती म्हणाली, 'सुसंगते, कशाला आतां त्या हकीगतीची आठवण ?' असें म्हणून ती रडूं लागली.

वसंतक—तिनें सांगितलेंच पाहिजे कशाला ? साधारण जनांच्या कधीं दृष्टीस सुद्धां पडणार नाहीं अशा प्रकारचा हा अलंकार तिच्याजवळ होता एवढ्यावरूनच नाहीं का समजत कीं तिचा जन्म कुठल्या तरी मोठ्या कुळांत झाला असला पाहिजे म्हणून; सुसंगते ! प्रियमित्र सध्यां कुठें आहे ?

सुसंगता—आतांच महाराज देवीच्या महालांतून बाहेर पडून स्फटिक-शिला-मंडपाकडे गेले. जावें तिकडे आपण. मीं पण आतां देवीकडे जातें. [जातात.

[राजा आसनावर बसला आहे असा प्रवेश.]

राजा—(विचार करतो.)

युक्तीनें शपथा दिल्या, मधुरही शब्दें तिला प्रार्थिलें।
पायांही पडलों, जरी सखिजनीं नानापरी बोधिलें ॥
झाली ती न तरी प्रसन्न मजला यत्नें अशाही, परी।
टाकी कोप धुवोनि अश्रु-सलिलें वाटे स्वयें सुंदरी ॥ १

(उत्कंठेनें निःश्वास टाकून) देवीची एकदां समजूत झाली. आतां सागरिकेबद्दलच मला चिंता वाटते आहे. कारण—

काया तिची मृदु सुरम्य जशी मृणाली।
आलिंगनीं प्रथमरागघनीं विराली॥
कामें स्वबाणनिचयें रचिल्याचि वाटे।
माझ्या शिरे प्रियतमा हृदयांत वाटे॥ २

(विचार करून) माझें विश्रांतिस्थान जो वसंतक त्याला पण देवीनें बंदींत टाकला आहे. आतां मन मोकळें करूं तरी कुणाजवळ?

[वसंतक प्रवेश करतो.]

वसंतक—(चालून व पाहून-आश्चर्यानें) गाढ उत्कंठेमुळें क्षीण झालेला असून सुद्धां अति मनोहर असा हा पहा माझा प्रियमित्र कसा बीजेच्या चंद्राप्रमाणें अधिकच शोभत आहे. मी याला जाऊन भेटतों. (पुढें होऊन) मित्रा! तुझें कल्याण असो! मित्रा! तुझें अभिनंदन करतों! कारण देवीच्या हातांत सांपडून सुद्धां पुन्हा तुला याच डोळ्यांनीं पहात आहें!

राजा—(पाहून-आनंदानें) अरे, हा पहा वसंतक आला! मित्रा भेट मला. (विदूषक मिठी मारतो.) तुझ्या वेषावरूनच कळतेंच आहे कीं, देवी तुझ्यावर प्रसन्न झाली. बरें, सागरिकेची काय खबर?

वसंतक—(दुःखी मुद्रा करून खालीं मान घालून उभा राहतो.)

राजा—मित्रा, कां बरें तूं बोलत नाहींस?

विदूषक—बातमी अप्रिय असल्यामुळें तुला सांगण्यास धीर होत नाहीं.

राजा—(उद्वेगानें व घाईनें) मित्रा! काय अप्रिय! ती हा लोक सोडून गेली असली पाहिजे हें उघडच आहे! हा प्रिये सागरिके! [मूर्च्छित पडतो.

विदूषक—(घाईनें) मित्रा, सावध हो! सावध हो!

राजा—(शुद्धीवर येऊन निःश्वास टाकून)—

जीवा! त्यजीं मज, अदाक्षिण मी, न व्हावें।
तूंही तसें, वच मदीय मनीं धरावें॥
जाशी न, सोस तरि तद्विरहास आतां।
गेली सुदूर गजगामिनि, ये न हाता॥

विदूषक—अरे, कांहीं तरी भलतीच समजूत करून घेऊन डोक्यांत राख घालूं नकोस. त्या बिचारीला देवीनें उज्जयनीला पाठविली असं म्हणतात हें ऐकून तुला दुःख होईल असें वाटल्यामुळें मी बोललों नाहीं.

राजा—काय ? उज्जयनीला पाठविली ? काय ही देवीची मजसंबंधीं निष्ठुरता ! मित्रा, तुला हें कुणीं सांगितलं ?

विदूषक—अरे सुसंगतेनें ! ही पहा रत्नमाला; तिनें माझ्याकडे कशाकरतां पाठविली कोण जाणे !

राजा—दुसरें कशासाठीं असणार ? मला समाधान वाटावें म्हणून. आण पाहूं तीं इकडे. (विदूषक देतो.)

राजा—(घेतो व निरखून पाहून वक्षःस्थळावर ठेवतो.) अहाहा !—

कंठालिंगन लाभोनी सखिचें मग बापुडी ।
गळाली; समदुःखी ही स्पर्शें शांतविते कुडी ४

मित्रा, ही तूंच गळयांत घाल म्हणजे हिच्याकडे पाहून तरी मला थोडें समाधान मिळेल.

विदूषक—जशी तुझी इच्छा. (माळ गळयांत घालतो.)

राजा—(दुःखानें पाहून) मित्रा, प्रियेचें दर्शन होणें आतां अशक्य.

वसंतक—(भीतीनें इकडे तिकडे पाहून) अरे असें मोठ्यानें बोलूं नकोस कदाचित् जवळपास कोणी असेल.

[वेत्रहस्ता वसुंधरा प्रवेश करते.]

वसुंधरा—(पुढें येऊन) महाराजांचा जयजयकार असो ! महाराज रुमण्वतांचे भाचे विजयवर्मा कांहीं तरी आनंदाची बातमी सांगण्यासाठीं आलेले अनुज्ञेची वाट पहात दारांत उभे आहेत.

राजा—वसुंधरे, त्यांना लवकर घेऊन ये.

वसुंधरा—जशी महाराजांची आज्ञा ! (जाऊन पुन्हा विजयवर्म्यासह परत येऊन) विजयवर्मराज, हे पहा महाराज, आपण व्हावें पुढें.

विजयवर्मा—(पुढें होऊन) महाराजांचा जयजयकार असो ! रुमण्वानास विजय झाल्यामुळें मी आपलें अभिनंदन करतों.

राजा—शाबास, रुमण्वान शाबास! थोड्याच वेळांत तूं मोठें कार्य पार पाडलेंस. विजयवर्मा, बसा असे. (विजयवर्मा बसतो.)

राजा—(आनंदानें) विजयवर्मा, कोसलेश्वराला जिंकला का?

विजयवर्मा—महाराजांच्या प्रभावामुळें.

राजा—विजयवर्मा, तर सविस्तर हकीगत सांगा पाहूं.

विजयवर्मा—महाराज, ऐकावें! आपण आज्ञा दिल्यानंतर हत्ती, घोडे, पायदळ असें अनेक प्रकारचें अगणित सैन्य बरोबर घेऊन आम्ही निघालों. नंतर कांहीं दिवसांनीं विंध्यपर्वतांतील आपल्या दुर्गाचा आश्रय करून राहिलेल्या कोसलेश्वराचा मार्ग रोखून धरून रुमण्वानांनीं वेढा द्यावयास सुरवात केली.

राजा—पुढें?

विजयवर्मा—नंतर कोसलेश्वरानें पण या अपमानानें चिडून जाऊन आपलें जवळ असलेलें हास्तिप्राय सर्व सैन्य तयार केलें.

विदूषक—अहो, हळू बोला! माझी छाती भीतीनें कशी धडधडते आहे, पहा!

राजा—पुढें?

विजयवर्मा—महाराज, अशा प्रकारें सोक्षमोक्ष करण्यासाठीं बाहेर पडलेल्या त्यानें—

युद्धार्थी विंध्य सोडी, अभिमुख मग ये, नाथ तो कोसलांचा।
रोधी दिग्भाग सारे समदगजघटासंघ वेगें तयाचा॥
वर्षे जो सायकांचा निकर. द्विगुणितोत्साह जो युद्धलाभें।
गांठी वैरी रुमण्वान्, गजपदमृत ते वीर देखोनि क्षोभें॥ ५

आणखी—

वीरांचीं उघडीं शिरें पहुडती शस्त्रास्त्रपातें क्षणीं।
रक्ताच्या सरिता, निनाद असिचा, अग्नी पडे घर्षणीं॥
ऐसें दारुण माजलें रण, नृपा! सेना प्रमुख्या लया।

राजा—काय! आपल्या पण सैन्याची हानी झाली?—

जातां, मारुनि कोसलाधिप शरें, पावे रुमण्वान् जया॥ ६

विदूषक—मित्रा, तुझा विजय असो. हो! हो! आमचा जय झाला. (नाचतो.)

राजा—शाबास, कोसलपते शाबास! मृत्यु पण तुला योग्यच मिळाला. ज्याच्या शौर्याची शत्रू पण स्तुति करतात ते धन्य होत! बरें, पुढें?

विजयवर्मा—महाराज, रुमण्वान् माझ्या मोठ्या बंधूला–जयवर्म्याला–तिकडे व्यवस्थेसाठीं ठेवून राहिलेलें जखमी झालेलें व थकलेलें सर्व सैन्य घेऊन हळुहळू परत येत आहे.

राजा—वसुंधरे, यौगंधरायणांना कळीव कीं, माझ्या प्रसादास साजेसा बहुमान करून यांना पारितोषक द्या म्हणून.

वसुंधरा—जशी महाराजांची आज्ञा. (विजयवर्म्यासह निघून जाते.)

[कांचनमाला प्रवेश करते.]

कांचनमाला—मला देवीनें आज्ञा केली, "कांचनमाले, या इंद्रजालिकाला महाराजांची भेट करीव" म्हणून (पाहून) हे पहा महाराज, तर व्हावें पुढें. (पुढें होऊन) महाराजांचा विजय असो! महाराज, देवीची अशी विज्ञप्ति आहे कीं, उज्जयनीहून संवरणसिद्धि नांवाचा कोणी इंद्रजालिक आला आहे त्यास महाराजांनीं कृपाळू होऊन दर्शन द्यावें.

राजा—आम्हांला पण इंद्रजालाचा नाद आहे. आण पाहूं त्याला इकडे.

कांचनमाला—जशी महाराजांची आज्ञा. [जाऊन पिच्छिक हातांत असलेल्या इंद्रजालिकासह प्रवेश करिते.] महाराज, हाच तो इंद्रजालिक.

इंद्रजालिक—(पुढें होऊन) महाराजांचा विजय असो. [पिच्छिका हालवून व पुष्कळ वेळां हंसून)

नमन असो इंद्रातें ज्यापासुनि इंद्रजालिका जनन।
विख्यात सुयश ज्याचें, त्या शबरातें असो नमन॥ ७

महाराज कौशांबीपते, फार काय—

आकाशीं पर्वत कीं, शशि धरणीगत प्रदोष मध्याह्नीं।
अग्नी दावूं जलिं कीं, सांग नृपा काय होत नसें॥

वसंतक—मित्रा, नीट लक्ष दे. हा म्हणतो त्याचप्रमाणें जर याचा खराच प्रभाव असला तर हा काय वाटेल तें दाखवील.

इंद्रजालिक—

जें जें मनिचें वांछित पहावया आवडी तुझी देवा।
दाविन गुरुप्रसादें तें तें, द्यावी प्रभो, सेवा॥ ९

राजा—थांब थोडा वेळ. कांचनमाले, देवीला जाऊन सांग कीं, हा इंद्रजालिक तुझा आहे आणि या वेळीं इथें परकें कुणी नाहीं, तेव्हां तू इकडे ये म्हणजे आपण बरोबरच पाहूं.

कांचनमाला—जशी महाराजांची आज्ञा. (जाऊन वासवदत्तेसह परत येते.)

वासवदत्ता—कांचनमाले, तो इंद्रजालिक उज्जयिनीहून आला आहे म्हणून मला त्याच्याबद्दल जरा विशेष वाटतें.

कांचनमाला—माहेरच्या कुळाचा देवीला पुष्कळ अभिमान आहे. इकडून यावें देवींनीं. (दोघी चालतात.)

वासवदत्ता—(पुढें होऊन) आर्यपुत्रांचा विजय असो.

राजा—देवि, मघांपासून यानें बरीच बडबड चालविली आहे, तर आपण इथं बसून याचा खेळ पाहूं. (वासवदत्ता बसते.)

राजा—कर आतां तुझा खेळ सुरू.

इंद्रजालिक—जशी महाराजांची आज्ञा. (पुष्कळ तऱ्हेचे खेळ करून पिच्छिका फिरवून)—

हरिहरब्रह्मादिक ते देव तसा इंद्र हा पहा! नयनीं।
चारण-सिद्ध-सुरांच्या नाचति तशा वधू गगनीं॥ १०

[सर्व आश्चर्यानें पाहतात.]

राजा—(वर पाहून व आसनावरून खालीं उतरून) काय आश्चर्य! काय आश्चर्य!!

वसंतक—आश्चर्य! आश्चर्य!

राजा—देवि, पहा!—

ब्रह्मा हा देख ! पद्मीं, रजनिकर-कला-शेखरा शंकरा या।
विष्णू हा शंखचक्रादिक धरुनि करीं, नाशितो दैत्यमाया ॥
पृष्ठीं ऐरावताच्या सुरपति बघ हा ! देवता सर्व अन्या।
आकाशीं नाचती या चलचरणरणन्नूपुरा दिव्य कन्या ॥ ११

वासवदत्ता—आश्चर्य ! आश्चर्य !!

वसंतक—बटकीच्या पोरा इंद्रजालिका ! ह्या देवांना आणि अप्सरांना कशाला दाखवतोस ? याला प्रसन्न करण्याचा जर तुझा हेतु असेल तर सागरिकेला दाखीव.

[वसुंधरा प्रवेश करते.]

वसुभूति—(राजाकडे येऊन) महाराजांचा विजय असो ! अमात्य यौगंधरायणाची महाराजांच्या चरणापाशीं विज्ञप्ति आहे. विक्रमबाहूनें आपले अमात्य वसुभूति महाराजांच्या भेटीसाठीं पाठविले आहेत तरी महाराजांनीं या सुमुहूर्तावर त्यांची भेट घ्यावी. मी पण हातांतलें काम संपवून हा आतांच येतों.

वासवदत्ता—आर्यपुत्र, राहूंद्या आतां हें इंद्रजालिक. माझ्या मामाकडून ह अमात्य वसुभूति आला आहे तर घ्यावी त्याची आतांच भेट.

राजा—तुझ्या म्हणण्याप्रमाणें होऊं दे (इंद्रजालिकास) जा, तूं आतां विश्रांति घे.

इंद्रजालिक—(पिच्छिका फिरवून) जशी महाराजांची आज्ञा. (जातांना) महाराजांनीं आणखी एक तरी माझा खेळ मग पहावा.

राजा—पाहूं मग.

वासवदत्ता—कांचनमाले, जा तूं याला बक्षीस दे.

कांचनमाला—जशी देवीची आज्ञा ! (इंद्रजालिकास घेऊन जाते.)

राजा—वसंतका, तूं सामोरा जाऊन अमात्य वसुभूतीला घेऊन ये.

वसंतक—जशी महाराजांची आज्ञा. [जातो.

[वसंतक पुढें व त्याच्या मागून वसुभूति व बाभ्रव्य प्रवेश करतात.]

वसुभूति—(चोहोंकडे पाहून) काय हें वत्सेश्वराचें ऐश्वर्य ! कारण—

मोही दृष्टिस हा गजेंद्र इकडे, या अश्वरत्नाकडे।
पाहें जों निरखोनि, गीति-लय हा पाडी मना सांकडें ॥
राजे हे जमले इथें, बघुनि हें ऐश्वर्य दारींच मी।
मानीं सिंहलभाग्य तुच्छ, पडलों ग्राम्यापरी संभ्रमीं ॥ १२

बाभ्रव्य—वसुभूते ! पुष्कळ दिवसांनीं स्वामींचें दर्शन घडणार म्हणून झालेल्या हर्षातिशयामुळें माझी कांहीं चमत्कारिकच स्थिति झाली आहे. कारण, पहा—

मनःक्षोभें माझ्या अधिकचि सुटे कंप तनुला ।
करी हा बाष्पांचा भर विकल दृष्टी हतबला ॥
गळा दाटे तेणें न वचन मुखांतूनि फुटतें ।
जरेतें साहाय्या करि बहल आनंद गमतें ॥ १३

वसंतक—(पुढें होऊन) यावें अमात्य.

वसुभूति—(विदूषकाच्या गळ्यांत रत्नमाला पाहून एकीकडे) बाभ्रव्य, मला वाटतें महाराजांनीं जाण्याच्या वेळीं राजकन्येला जी रत्नमाला अर्पण केली तीच ही असावी.

बाभ्रव्य—अमात्य, सारखेपणा बराच आहे खरा. मी विचारतों वसंतकाला, ही त्याला कशी मिळाली तें.

वसुभूति—छेः, छे ! असें करूं नकोस. राजकुलांत अगणित रत्नें असल्यामुळें अशा प्रकारचें सादृश्य असणें शक्य आहे.

वसंतक—हे पहा महाराज, यावें अमात्यांनीं पुढें.

वसुभूति—(पुढें सरून) महाराजांचा विजय असो.

राजा—(उठून) मी प्रणाम करतों.

वसुभूति—कल्याण असो.

राजा—अमात्यासाठीं आसन कुठें आहे ?

वसंतक—(आसन आणून) हें पहा आसन. बसावें अमात्यांनीं.(वसुभूति बसतो.)

बाभ्रव्य—महाराज, हा बाभ्रव्य प्रणाम करीत आहे.

राजा—(पाठीवर हात ठेवून) बाभ्रव्य, बैस इथें.

वसंतक—अमात्य, देवी वासवदत्ता नमस्कार करिते.

वासवदत्ता—आर्य नमस्कार करितें.

वसुभूति—आयुष्मति, तुला वत्सराजास योग्य असा पुत्र होवो.(सर्व बसतात.)

राजा—आर्य वसुभूते ! सिंहलेश्वराचें कुशल आहे ना ?

वसुभूति—(वर पाहून निःश्वास टाकून) म्यां मंदभाग्यानें आतां काय सांगावें तेंच मला सुचत नाहीं. (खालीं मान घालतो.)

वासवदत्ता—अरे देवा! आतां वसुभूति काय सांगेल कुणास ठाऊक!

राजा—वसुभूते! सांगा लवकर. कशाला आम्हांस संशयांत ठेवतां?

बाभ्रव्य—(एकीकडे) जर कांहीं सांगावयाचें असलें तर आतांच सांगून टाका.

वसुभूति—(डोळ्यांत पाणी आणून) महाराज, तें सांगायला जीभच उचलत नाहीं! पण मीं मंदभाग्यानेंच तें सांगितलें पाहिजे असें जर विधिलेखन असलें तर तें कोण चुकवणार? महाराज, सिंहलेश्वराची रत्नावली नांवाची एक कन्या होती. कोणा सिद्धानें तिच्यासंबंधीं असें भविष्य केलें होतें कीं, जो कोणी हिचें पाणिग्रहण करील तो सार्वभौम राजा होईल.

राजा—पुढें?

वसुभूति—त्या सिद्धाच्या बोलण्यावर विश्वास असल्यामुळें यौगंधरायणांनीं महाराजांसाठीं तिची मागणी घातली होती; परंतु त्यामुळें वासवदत्तेच्या मनाला वैषम्य वाटेल असें वाटल्यावरून आमच्या महाराजांनीं ती नाकारली.

राजा—(एकीकडे) देवि! हा तुझ्या मामाचा अमात्य उगाच मिथ्या भाषण करीत आहे नाहीं का?

वासवदत्ता—(विचार करीत) इथें कोण मिथ्या भाषण करीत आहे तेंच मला समजत नाहीं.

वसुंधरा—बरें! पुढें तिचें काय झालें?

वसुभूति—नंतर लावणकांत लागलेल्या आगींत देवी नाश पावली अशी बातमी उठवून देऊन महाराजांनीं बाभ्रव्याला पुन्हा पाठविला व तिची मागणी घातली, तेव्हां महाराजांबरोबरच्या नात्याचा लोप होऊं नये म्हणून सिंहलेश्वरांनीं मागणी कबूल केली व आम्हांला बरोबर देऊन तिची पाठवणी केली; परंतु वाटेंत आमची नौका फुटल्यामुळें ती समुद्रांत बुडाली. (रडत खालीं पहातो.)

वासवदत्ता—(रडत) हाय! काय फुटक्या नशिबाची मी! हे भगिनि रत्नावलि! कुठें बरें असशील तूं या वेळीं! माझ्याशीं दोन शब्द तरी बोल! (मूर्च्छित पडते.)

राजा—शांत हो, शांत हो ! दैवाची गति कांहीं विलक्षणच असते ! हे पण दोघेजण नौका फुटली असूनसुद्धां परत जिवंत आले यावरूनच नाहीं का हें सिद्ध होत ?

वासवदत्ता—खरेंच तें. पण माझें मंदभागिनीचें कुठलें एवढें भाग्य ?

राजा—(ऐकल्यासारखें दाखवून) बाभ्रव्य, खरोखरच हा काय प्रकार आहे तेंच मला कळत नाहीं.

बाभ्रव्य—महाराज, ऐकावें.

[पडद्यांत मोठा आवाज]

ज्वाळांनीं सोनियांचे कळसचि रचिले हर्म्यशृंगां प्रसारें।
शोंडे दाह-प्रकर्षें उपवनतरुचे म्लान हे होति सारे॥
धूमाचे लोट वेगें करिति जलधरश्याम लीलागिरींतें।
अग्नी अंतःपुरीं हा अवचित भडके, मूर्च्छवी योषितांतें॥ १४

[सर्व भीतीनें पाहतात.]

राजा—काय ? अंतःपुराला अग्नि लागला ? (घाईनें उठून) हाय ! हाय ! देवी वासवदत्ता जळाली वाटतं !

देवीची दाहवार्ता जी, पूर्वी लावणकांतरीं।
पसरे, ती खरी व्हाया, उठे हा अग्नि सत्वरी॥ १५

वासवदत्ता—आर्यपुत्र, रक्षण करा ! रक्षण करा !

राजा—फारच धांदल झाल्यामुळें शेजारीं असलेल्या देवीला पण मी विसरून गेलों. (देवीचा हात धरून आलिंगन देतो.) देवि, घाबरूं नकोस, घाबरूं नकोस.

वासवदत्ता—आर्यपुत्र, 'रक्षण करा' म्हणून मीं माझ्यासाठीं नाहीं सांगितलें. निर्दयपणें बांधून घातलेली सागरिका मात्र आंत जळून मरेल, तर तिचें रक्षण करावयचा कांहीं उपाय काढावा.

राजा—काय म्हणतेस ? सागरिका जळून मरत आहे ? हा पहा मी चाललोंच तिची सुटका करण्याकरितां.

वसुभूति—महाराज, पतंगाप्रमाणें हें अनुचित साहस करूं नये.

बाभ्रव्य—वसुभूतींचें म्हणणें खरें आहे महाराज.

वसंतक—(राजाचें उत्तरीय धरून) खरेंच हें भलतें साहस करूं नकोस.

राजा—(उत्तरीय सोडवून घेऊन) मूर्खा, सागरिका मरत आहे समजलास ! अशा वेळीं प्राणाची आशा का करायची ?

[अग्नींत प्रवेश करून धुरानें अडथळा झाल्यासारखें दाखवितो.]

झडकरि शमवीं हा धूमविस्तार सारा।
प्रकटविशि कशाला ज्योतिंचा हा पसारा ? ॥
प्रलय-दहन-दाहें जो प्रियेच्या वियोगें।
अचल, न गणि अग्ने ! तो तुझीं ढोंगसोंगें १६

वासवदत्ता—माझ्या दुष्टेच्या सांगण्यावरून आर्यपुत्रांनीं असें केलें तर मी पण आतां आर्यपुत्रांच्या पाठीमागें जातें.

वसंतक—देवि, मी तुझा मार्गदर्शक होतों.

वसुभूति—काय ? महाराज वत्सराजांनीं अग्नींत प्रवेश केला. राजकन्येचें मरण डोळ्यांनीं पाहिलें तेव्हां मीसुद्धां इथेंच आत्माहुति द्यावी, हेंच खरें.

बाभ्रव्य—(रडत) महाराज, कां बरें आपण सर्व भरतकुलाच्या विनाशाची वेळ आणलीत ! अथवा आतां बोलून काय उपयोग ! मीसुद्धां स्वामिभक्तीस योग्य असेंच आचरण करतों. (सर्व अग्निप्रवेश करतात.)

राजा—(उजवा बाहु स्फुरत आहे असें दाखवून) अशा स्थितींतसुद्धां हीं शुभसूचक चिन्हें कां बरें होत आहेत ! (समोर पाहून आनंदातिशयानें) काय ! सागरिका जळून जाण्याच्या बेतांत आहे ! लवकरच जाऊन तिची सुटका करतों. (बांधून घातलेली सागरिका दिसते.)

सागरिका—(इकडे तिकडे पाहून) हाय ! हाय ! चारी बाजूंनीं अग्नि पेटला ! बरें, हा हुताशन तरी आज कृपाळु होऊन माझ्या दुःखाचा शेवट करील.

राजा—(वेगानें येऊन) प्रिये, अद्याप तूं अशी स्वस्थ काय बसून राहिली आहेस !

सागरिका—(राजाला पाहून स्वगत) काय महाराज ! यांना पाहून पुन्हा मला जगावें असें वाटूं लागलें आहे. (उघड) महाराज, रक्षण करा !

राजा—थांब, घाबरूं नकोस.

मुहूर्तभरि साहिं हा बहुल धूम गे कोमले।

(पुढें पाहून)

स्तनांशुक गळे? गळो, अहह! हें जळो लागलें।

(पाहून)

गतिस्खलन कां असें? निगडिली पदीं शृंखला!।

(घट्ट धरून)

गळां त्वरित दे मिठी उचलुनीच नेतों तुला॥ १७

(सागरिकेला मिठी मारून डोळे मिटून स्पर्शसुखाचा अभिनय करीत) एका क्षणांत माझा सर्व संताप नाहींसा झाला, केवढें हें आश्चर्य! प्रिये, सावध हो.

स्पर्शला खास देहातें, न जाळी परि हा तुला।
गमतें तव सान्निध्यें मुकला दाहशक्तिला॥ १८

(डोळे उघडून) काय हें आश्चर्य! कुठें आहे तो धडधडणारा अग्नि! काय अन्तःपुर पण जसास तसेंच आहे! काय आहे हा विलक्षण प्रकार!

वासवदत्ता—(राजाचें शरीर निरखून पहात) सुदैवानें महाराज तर सुरक्षित आहेत.

राजा—

गेला कुठें भयद पावक? सर्वथाही।
शुद्धांत अक्षत! अवंतिनृपात्मजा ही!॥
बाभ्रव्य हा!

बाभ्रव्य—महाराजांचा विजय असो. महाराज आज आमचा पुनर्जन्मच झाला.

राजा—

प्रिय सखा!

वसंतक—महाराजांचा विजय असो.

राजा—

वसुभूति तैसा॥

वसुभूति—महाराजांचें अभिनंदन करतों.

राजा—(विचार करीत).

कीं इंद्रजाल? मतितें भ्रम होय खासा !। १९

वसंतक—त्याबद्दल शंकाच नको ! इंद्रजालच हें, त्या बटकीच्या इंद्रजालिकानें जातांना म्हटलें होतें नाहीं कां कीं, माझा आणखी एक खेळ अवश्य पाहिला पाहिजे म्हणून ! तोच हा असला पाहिजे.

राजा—देवि, तुझ्या सांगण्याप्रमाणें ही पहा मीं सागरिका इकडे आणली.

वासवदत्ता—(हंसून) आर्यपुत्र, समजलें मला सर्व.

वसुभूति—(सागरिकेला पाहून एकीकडे) बाभ्रव्य, ही तर मुलगी थेट आपल्या राजकन्येसारखी दिसते.

बाभ्रव्य—अमात्य ! मला पण असेंच वाटतें.

वसुभूति—महाराज, कुठून आणली ही मुलगी ?

राजा—देवीला ठाऊक.

वासवदत्ता—अमात्य ! ही समुद्रांत सांपडली असें सांगून यौगंधरायणांनीं माझ्या स्वाधीन केली, म्हणूनच हिला सागरिका म्हणतात.

राजा—(स्वगत) काय ? यौगंधरायणानें दिली ! मला सांगितल्याशिवाय तो तर कांहींच करीत नाहीं.

वसुभूति—(एकीकडे) बाभ्रव्य ! वसंतकाच्या गळ्यांतील रत्नमालेचें विलक्षण सादृश्य आणि हिची सागरापासून झालेली प्राप्ति ह्या गोष्टींच्या मेळावरून माझी खात्री आहे कीं, हीच सिंहलेश्वराची कन्या रत्नावली. (पुढें सरून उघड) आयुष्मति रत्नावली, काय ही तुझी दशा !

सागरिका—(वसुभूतीस पाहून रडत) काय अमात्य वसुभूति !

वसुभूति—हाय ! हाय ! धिक्कार असो या मंदभाग्याला. (जमिनीवर पडतो.)

सागरिका—हाय ! हाय ! आई बाबा ! कुठें आहांत तुम्ही ! मला उत्तर तरी द्या. (भूमीवर पडून मूर्च्छित होते.)

वासवदत्ता—(घाईनें) कंचुकी, ही माझी भगिनी, रत्नावली काय ?

बाभ्रव्य—देवी हीच ती.

वासवदत्ता—(रत्नावलीस पोटाशीं धरून) भगिनी सावध हो! सावध हो!

राजा—काय! अभिजात कुळांत जन्म पावलेल्या सिंहलेश्वर विक्रमबाहूची ही कन्या!

वसंतक—(स्वगत) रत्नमाला पाहिल्याबरोबरच मला वाटलें कीं, अशा प्रकारचा अलंकार सामान्य जनांजवळ असणें संभवनीय नाहीं म्हणून.

वसुभूति—(उठून) राज्यकन्ये, सावध हो! सावध हो! ही पहा तुझी ज्येष्ठ भगिनी दुःख करीत आहे. तिला आनंदानें मिठी मार.

रत्नावली—(सावध होऊन तिरप्या नजरेनें राजाकडे पहात स्वगत) मीं देवींचा महान् अपराध केला आहे. तिला आतां तोंड दाखविण्याला मला लज्जा वाटते.

वासवदत्ता—(हात पसरून) ये अतिनिष्ठुर परंतु परमप्रिय भगिनी ये आणि आपलें प्रेम व्यक्त कर. (रत्नावली अडखळल्यासारखें दाखवते.)

वासवदत्ता—(एकीकडे) आर्यपुत्र! माझ्या निष्ठुरपणाची मला आतां फार लाज वाटूं लागली आहे. तर आपण तिचीं बंधनें सोडावीं.


राजा—(आनंदानें) जशी तुझी इच्छा. (सागरिकेचीं बंधनें सोडतो.)

वासवदत्ता—आर्यपुत्र! माझ्याकडून असें निष्ठुर आचरण घडविण्यास कारण अमात्य यौगंधरायणच. त्यांना माहीत असून त्यांनीं मला कळवलें नाहीं.

यौगंधरायण—(प्रवेश करून)

राज्ञी वांकवि मान भर्तृ-विरहा आश्वासुनी मद्वचीं।
तैसी अन्य-कलत्र-योग-घटना तीतें रुजा दे दुजी॥
येतां भूपकरीं अखंड वसुधा घाली जरी स्वामिनी।
मी पूर्व-स्मरणेंचि लज्जित, मुखा दावावया भीं मनीं॥ २०

अथवा याला काय उपाय! अत्यंत मानधन आणि सरळ अशा माणसाबरोबर सुद्धां वेळीं वांकडेपणानें वर्तन करावयास लावणारें हें स्वामिभक्तिव्रत आहे (पाहून) हें पहा महाराज, आतां पुढें व्हावें (पुढें सरून) महाराजांचा जयजयकार असो. (पायांवर डोकें ठेवून) जें मीं स्वतःच्या जबाबदारीवर केलें त्याची महाराजांनीं क्षमा करावी.



सागरिका-विमोचन.

Lakshmi Art, Bombay, 8.

राजा—सांगा पाहूं मला कळवल्याशिवाय काय केलेंत तें ?

यौगंधरायण—महाराजांनीं बसावें. मी सर्व सांगतों.

(सर्वजण योग्य स्थानीं बसतात.)

यौगंधरायण—महाराज, ऐकावें ! ही सिंहलेश्वराची कन्या ! हिच्यासंबंधानें एका महान् सिद्ध पुरुषानें असें भविष्य केलें आहे कीं, जो कोणी हिचें पाणिग्रहण करील तो पृथ्वीचा अधिपति होईल ! त्यावर विश्वास असल्यामुळें स्वामींच्या अभ्युदयासाठीं मीं सिंहलेश्वराकडे हिच्यासाठीं पुष्कळ वेळां मागणी घातली; परंतु देवीला खेद होईल असें वाटल्यावरून सिंहलेश्वरानें ती नाकारली तेव्हां—

राजा—तेव्हां काय झालें ?

यौगंधरायण—(खालीं मान घालून) तेव्हां लावणकांत लागलेल्या आगींत देवी जळून परलोकीं गेली अशी बातमी उठवून मीं पुन्हा बाभ्रव्याला सिंहलेश्वराकडे पाठविला.

राजा—यौगंधरायण ! पुढचें सर्व मीं ऐकलें पण तिला देवीच्या स्वाधीन करण्यांत आपला काय हेतु ?

वसंतक—मीं जाणला त्यांतला हेतु ! सांगितल्याशिवाय नाहीं का एवढें लक्ष्यांत येत, कीं हिला अंतःपुरांत ठेवली म्हणजे अंतःपुरांत नेहमीं येत असलेल्या महाराजांच्याही सहजच दृष्टीस पडेल.

राजा—यौगंधरायण ! वसंतकाचें म्हणणें बरोबर आहे का ?

यौगंधरायण—होय महाराज.

राजा—या इंद्रजालिकासंबंधाची सर्व भानगड आपलीच वाटतें ?

यौगंधरायण—नाहींतर अंतःपुरांत बंदींत टाकली असतां हिचें महाराजांना कसें दर्शन झालें असतें व पाहिल्याशिवाय अमात्य वसुभूतींनीं तरी हिला कशी ओळखली असती ? (हंसून) ओळख पटल्यानंतर आतां आपल्या भगिनीची वाटेल ती व्यवस्था करण्यास देवी समर्थ आहेत.

वासवदत्ता—(हंसत) आर्य अमात्य ! उघड कां नाहीं सांगत कीं, आर्यपुत्रांबरोबर हिचा विवाह करून दे म्हणून. (आपल्या अंगावरचे दागिने काढून रत्नावलीस घालून) महाराज, स्वीकार करावा ह्या रत्नावलीचा.

राजा—(दोन्ही हात पुढें करून) देवीचा प्रसाद कुणास नको होईल.

वासवदत्ता—आर्यपुत्र ! हिचें माहेर फार दूर राहिलें; तर आपण हिला अशा तऱ्हेनें वागवावी कीं, हिला माहेरच्या माणसांची आठवण होणार नाहीं. (समर्पण करते.)

राजा—जशी देवीची आज्ञा.

वसंतक—(आनंदानें नाचतो.) प्रियमित्राच्या हातांत आतां अखिल पृथ्वी आलीच.

वसुभूति—राजपुत्री ! देवी वासवदत्तेला नमस्कार कर. (रत्नावली तसें करते.)

बाभ्रव्य—देवि ! देवी हा शब्द तुला खरेंच शोभतो.

(वासवदत्ता रत्नावलीस पोटाशीं धरून देवी हा शब्द अर्पण करिते.)

बाभ्रव्य—आतां आमच्या श्रमांचें सार्थक झालें.

यौगंधरायण—महाराज, आणखी काय आपलें प्रिय मीं करावें अशी आपली इच्छा आहे ?

राजा—ह्याहून आणखी दुसरें प्रिय तें काय असणार ?

झाला विक्रम-बाहु आप्त, करिं ये सर्वस्व पृथ्वींतलीं।
ही रत्नावलि, सार्वभौम पदवी जीच्या पदीं गुंतली॥
देवी तुष्टचि संगमें भगिनिच्या, जिंकीं बळें कोशलां।
राहे बुद्धिबलें तुझ्या न सचिवा ! प्राप्तव्य कांहीं मला॥ २१

परंतु एवढें असूंद्या—

पर्जन्यें सुफला करो हरि मही धान्यादिकांच्या भरें।
यज्ञें तुष्ट करोत देव अवघे सद्विप्रही आदरें॥
वर्तो सज्जनसंगमीं जन सुखें सृष्टी टिके तोंवरी।
होवो नष्ट जगांतुनी खलगिरा जी कालकूटापरी॥ २२

'इंद्रजालिक' नांवाचा चवथा अंक समाप्त

→ समाप्त ←



सुखमय परिणाम.

Lakshmi Art, Bombay, 8.